# फार्मसी अभ्यासक्रम प्रवेशासाठी मुदतवाढ

## अभाविपच्या मागणीला यश; विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

औषधनिर्माणशास्त्र (फार्मसी) पदव्युत्तर पदवी परीक्षेसाठी राज्य सामायिक परीक्षामार्फत प्रवेश प्रकिया सुरू करण्यात आली असून यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने (अभाविप) ने याबाबत सातत्याने पाठपुरावा केला होता. आता विद्यार्थ्यांना १९ ऑगस्टपर्यंत प्रवेश अर्ज भरता येणार आहेत.




औषधनिर्माणशास्त्र पदव्युत्तर पदवी परीक्षेसाठी ५ ऑगस्ट ही अर्ज करण्यासाठी अंतिम दिनांक होती, परंतु या तारखेपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे पुनर्मूल्यांकन निकाल तसेच शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचे निकालच जाहीर झाले नसल्यामुळे अनेक विद्यार्थी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी अर्ज करू शकले नाहीत.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने याबाबत पाठपुरावा करीत राज्य सामाईक परीक्षा कक्ष आयुक्त महेंद्र वारभुवन, तसेच उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांची भेट घेत विद्यार्थ्यांना समान संधी उपलब्ध व्हावी तसेच प्रशासनाच्या असमन्वयामुळे कुठल्याही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची काळजी करीत प्रवेश अर्ज करण्यासाठी मुदतवाढ मिळावी या मागणीचे निवेदन देण्यात आले.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या विद्यार्थी हिताच्या मागणीचा सकारात्मक विचार करीत उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी संबंधित विभागांना योग्य आदेश देत पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे अर्ज भरण्यास मुदतवाढ मिळण्याची मागणी मान्य केली व त्याबाबतचे आदेश काढत १९ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

औषधनिर्माणशास्त्र पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाला अर्ज करण्यासाठी मुदतवाढ मिळाल्यामुळे हजारो विद्यार्थ्यांना न्याय मिळाला असून राज्य सामायिक परीक्षा कक्ष व विद्यापीठे यांच्या असमन्वयामुळे हा प्रकार घडला. यापुढे असे प्रकार घडणार नाही याची काळजी राज्य सामायिक परीक्षा कक्षाने घ्यावी, असे मत अभाविप कोकण प्रदेश मंत्री अमित ढोमसे यांनी व्यक्त केले.

# डोळे येण्याच्या संसर्गावर स्वच्छतेतून प्रतिबंध करावा



## आरोग्य विभागाचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**


राज्यातील अनेक भागात डोळे येणे या आजाराच्या रुग्ण संख्येमध्ये वाढ होताना दिसत आहे. डोळे येणे मुख्यत्वे डिनो वायरसमुळे होतो. हा सौम्य प्रकारचा संसर्ग आहे. साधारणपणे या रुग्णामध्ये डोळा लाल होणे, वारंवार पाणी गळणे, डोळ्याला सूज येणे अशी लक्षणे आढळतात. डोळे आलेल्या व्यक्तींनी स्वत:ला घरामध्ये विलगीकरण करणे गरजेचे आहे. आजाराचा संसर्ग एका व्यक्तीपासून दुसऱ्या व्यक्तीला वेगाने होतो. त्यामुळे हा आजार होऊ नये म्हणून वारंवार हात धुणे, वैयक्तिक स्वच्छता ठेवणे आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य उपचार घेणे, डोळ्यांना हात न लावून या आजाराला प्रतिबंध करावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

आरोग्य विभागामार्फत प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून ज्या भागामध्ये डोळे येण्याची साथ सुरू आहे, त्या भागामध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत घरोघरी सर्वेक्षण करण्यात येत आहे. सर्व जिल्ह्यांना आरोग्य शिक्षणाचे प्रोटोटाईप तयार करून देण्यात आले आहे. ज्या भागामध्ये साथ सुरू झाली आहे त्या भागातील शाळेतील मुलांची डोळ्यांची तपासणी करून उपचार देण्यात येत आहेत. सर्व आरोग्य संस्थांमध्ये आजाराच्या उपचारासाठी लागणारी आवश्यक औषधे उपलब्ध करण्यात आले आहे. राष्ट्रीय विषाणू संस्था व राज्यातील शीघ्र प्रतिसाद पथकाने आळंदी येथील साथीचे अन्वेषण केले आहे. राज्यात ९ ऑगस्टपर्यंत तीन लक्ष ५७ हजार २६५ एकूण रुग्ण आढळले आहेत.

# देशी बनावटीचे पिस्तुल विक्रीसाठी आलेल्या दोघांना अटक

**पनवेल : वार्ताहर**

देशी बनावटीचे पिस्टल, दोन मॅग्जिन, जीवंत काडतुसांची उत्तर प्रदेशातून बेकायदेशीररित्या विक्री करण्याकरिता आलेल्या दोघांना मुंब्रा पोलिसांनी गजाआड केले आहे. त्यांच्या अटकेमुळे आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.



मुंब्रा पोलीस ठाण्याचे एनडीपीएस पथकास कौसा मुंब्रा या ठिकाणी दोघे देशी बनावटीचे पिस्तुल विक्रीकरीता येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने सापळा रचून आरोपी इसम मोहम्मद हाशीम इस्त्राईल खान (वय २९, रा. फत्तेहपूर) व त्याचा सहकारी मोहमद रजा मोहमद वजी खान (वय २४, रा.फत्तेहपूर) या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे देशी बनावटीचे पिस्तुल, दोन मॅग्जिन, जीवंत काडतुसे तसेच त्यांच्यासोबत असलेली बुलेट असा मिळून जवळपास एक लाख ४६ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

याबाबत पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक नितीन भोसले करीत आहेत.

# महापारेषणमध्ये घेतली पंचप्राण शपथ

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या सूचनेनुसार स्वातंत्र्यांच्या अमृत महोत्सवाच्या समारोपानिमित्त राज्यात माझी माती, माझा देश अभियानांतर्गत महापारेषणमध्ये बुधवारी (दि. ९) महापारेषणच्या सांघिक कार्यालय व राज्यातील ठिकठिकाणच्या कार्यालयात कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी पंचप्राण शपथ घेण्यात आली.



वांद्रे येथील प्रकाशगंगा इमारतीत महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) सुगत गमरे यांनी भारतास २०४७पर्यंत आत्मनिर्भर आणि विकसित राष्ट्र बनवण्याचे स्वप्न साकार करू, गुलामगिरीची मानसिकता मुळापासून नष्ट करू, देशाच्या समृद्ध वारशाचा गौरव करू भारताची एकात्मता बलशाली करू आणि देशाचे संरक्षण करण्यांप्रती सन्मान बाळगू. देशाचे नागरिक म्हणून सर्व कर्तव्यांचे पालन करू, ही पंचप्राण शपथ उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिली, तसेच महापारेषणच्या महाराष्ट्रातील विविध कार्यालयात मुख्य अभियंता यांनी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना पंचप्रण शपथ दिली.

या वेळी मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) सुधीर वानखेडे, मुख्य अभियंता पीयूष शर्मा, महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) अंजू गुप्ता, महाव्यवस्थापक (मा. सं.आस्थापना) राजू गायकवाड, अधीक्षक अभियंता त्र्यंबक ढेंगळे, संजीवकुमार बड्डेला, सचिन खडगी, सहायक महाव्यवस्थापक महेश सावंत, इमाम सिद्दीकी, महेश आंबेकर उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात अविष्कार ओरिएंटेशन प्रोग्राम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शुक्रवारी (दि. ११) व्यवसाय व्यवस्थापन व शिक्षण विभाग व रिसर्च अविष्कार कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाईन अविष्कार ओरिएंटेशनचे आयोजन केले होते.

या ऑनलाईन अविष्कार ओरिएंटेशन प्रोग्रॅमसाठी मोतीलाल झुनझुनवाला आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय वाशीच्या सहाय्यक प्राध्यापक डॉ. सीए मीनाक्षी या प्रमुख वक्त्या म्हणून ऑनलाइन उपस्थित होत्या. या प्रोग्रॅमच्या माध्यमातून त्यांनी महाविद्यालयातील सर्व शाखेतील विद्यार्थ्यांना संशोधनाबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले.

त्यामध्ये प्रामुख्याने संशोधन पद्धती, संशोधनाचे प्रकार, संशोधनातील असणारे बारकावे, गृहीतके व संदर्भ या सर्व संशोधनाशी संबंधित असणाऱ्या घटकांचा समावेश होता. या सर्व महत्वपूर्ण माहितीचा लाभ महाविद्यालयातील सर्व शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना मुंबई विद्यापीठ अंतर्गत होणाऱ्या रिसर्च आविष्कार कन्वेंशन स्पर्धेसाठी तीनही फेरीसाठी होणार आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी महाविद्यालयातील सर्व शाखेतील विद्यार्थ्यांना संशोधनाबद्दल मार्गदर्शन केले, तसेच शुभेच्छा दिल्या.

या रिसर्च अविष्कार ओरिएंटेशनचे आयोजन व्यवसाय व्यवस्थापन व शिक्षण विभाग प्रमुख प्रा. रीत ठुले व रिसर्च आविष्कार कमिटी समन्वयक प्रा. डॉ. दीपिका हसीजा यांनी केले, तसेच अंतर्गत गुणवत्ता कक्ष समन्वयक प्रा. महेश्वरी झिरपे व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले. या ऑनलाईन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पूजा लांजेकर यांनी केले व कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांचे आभार मानले.

# कळंबोलीत बचत गटाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी विषयावर महिलांना मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बचतगटाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी विषयावर कळंबोलीतील सुधागड हायस्कूल येथील सभागृहात सामाजिक कार्यकर्त्या संध्याराणी पाटील यांच्या पुढाकाराने महिलांसाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी कळंबोली वसाहतीतील व परिसरात घरगुती व्यवसाय करणाऱ्या शंभराहून अधिक महिलांनी व गृहिणींनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. या वेळी पनवेल महापालिकेच्या दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका विभागाच्या तांत्रिक तज्ज्ञ विनया म्हात्रे यांनी महिलांना रोजगारविषयक मार्गदर्शन केले.



या वेळी शिवसेनेचे रायगड जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे प्रमुख अतिथी म्हणून व्यासपीठावर उपस्थित होते. महिलांमध्ये विविध कौशल्य असते. बचतगटाच्या माध्यमातून महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध होत आहे. त्यामुळे महिला स्वावलंबी बनत चालल्या आहेत. सरकारी पातळीवर बचतगटांच्या अनेक योजना आहेत. या अनुषंगाने मार्गदर्शन करताना रामदास शेवाळे यांनी बचतगटाचे महत्त्व विशद केले. या वेळी कुंदा गोळे, ज्योती पाटील, वनिता रिटे, संजीवनी सोनावणे, डॉ.योगेंद्र कोलते, रेश्मा वाघमारे, काजल काकडे, राजेश शेट्टी यांच्यासह आदी उपस्थित होते.

बचतगटांच्या माध्यमातून स्त्रियांना रोजगाराचा उत्तम पर्याय निर्माण होतो. आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि विविध स्तरातील महिलांना रोजगार मिळावा यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. बचतगटांच्या माध्यमातून स्त्रियांना रोजगारांची नवी संधी मिळत आहे.

बचतगटांच्या माध्यमातून महिलांना हक्काचे व्यासपीठ मिळाले आहे. त्यामुळे महिलांनी यातून प्रेरणा घेऊन काम केले पाहिजे, तसेच महिलांनी बचतगटांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्त्या संध्याराणी पाटील यांनी या वेळी केले.

# पनवेल रेल्वेस्थानक मार्गावर झालेल्या खुनातील आरोपी अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रेल्वेस्थानक मार्गावर मंगळवारी पहाटेच्या सुमारास अज्ञात मारेकऱ्याने खून केला होता. मृताची ओळख पटल्यानंतर अवघ्या ४८ तासांत अज्ञात असलेल्या आरोपीला बेड्या ठोकण्यात पोलिसांना यश आले.

पनवेल रेल्वेस्थानक मार्गावर मंगळवारी एका अनोळखी व्यक्तीचा खून झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्या वेळी जमलेल्या गर्दीत मयताचा मेहुणा उपस्थित असल्यामुळे ओळख पटवून पनवेल शहर पोलीस ठाण्यात भादवि कलम ३०२ प्रमाणे अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलीस आयुक्त मिलींद भारंबे, सहपोलीस आयुक्त संजय मोहिते यांनी केलेल्या सूचनेनुसार व पोलीस उपआयुक्त पंकज डाहणे, परिमंडळ २, पनवेल व सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत, पनवेल विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने गुप्त बातमीदाराकडून माहिती प्राप्त सचिन अरुण शिंदे (रा. बौद्धवाडा, मु. कंकराला, पो. जरंदी, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद) याने केला असल्याचे व आरोपी हा अस्तित्व लपविण्यासाठी मुळ गावी असल्याचे तपासात उघड झाले. त्यानुसार आरोपीला त्याच्या राहत्या घरातून गुरुवारी (दि. १०) ताब्यात घेतले.

**Loss of Original Registered Agreement Papers**

This is to inform that, I am a Owner of the Plot No. 791, Road No. 07, KWC, Steel Market, Kalamboli, Navi Mumbai-410218. and the Original Registered Agreement Papers of the said Plot are now misplaced or not traceable. FIR Logged at kalamboli police station, Registration no. 904/2023 dt. 11/08/2023 Any body having any objections to issuances of duplicate Registered Agreement Papers in lieu of the above, may please write to the below address.

**M/s. Shri. Jagdeep Singh Malik**
**Plot No. 791, Road No. 07, KWC, Steel Market, Kalamboli, Navi Mumbai-410218. Mob. : 9321027929**

# महाडच्या बालाजी मंदिरात पुरूषोत्तम याग

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाड शहरामधील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील श्रीबालाजी मंदिरामध्ये अधिक महिन्यानिमित्त येत्या सोमवारी (दि. १४) पुरूषोत्तम यागाला उपस्थित राहून विष्णूभावित होण्याची विशेष संधी प्राप्त होणार असल्याची माहिती महाड शहरातील नितीन जोशी यांनी दिली.

अधिक महिन्यामध्ये जो श्रद्धायुक्त अंतकरणाने माझी विधीवत पूजा करतो, तो नि:संशय मला प्राप्त होतो, असे पुरूषोत्तमाचे विधान आहे. या पापविनाशी यज्ञगंगेमध्ये सहभागी होऊन स्नानाचे पुण्य प्राप्त करण्यासाठी यजमानपददेखील भुषविता येणार असून भाविकांनी यजमान पदाचे नियोजन करण्यासाठी तातडीने (९८५०२२१९९०) या क्रमांकावर संपर्क करण्याची आवश्यकता आहे. या सद्धर्म कार्यास उपस्थित राहून रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या वेळी योगेश प्रसाद हर्डीकर आणि श्रीकांत चतुर्भुज मुंदडा हे उपस्थित राहणार आहेत.

पान १ वरून

## स्वातंत्र्यसैनिकांच्या सन्मानातून मोठा संदेश –आमदार प्रशांत ठाकूर

या कार्यक्रमास पोलीस उपायुक्त पंकज डहाणे, अतिरिक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त सचिन पवार, कैलास गावडे, डॉ. वैभव विधाते, अभिषेक पराडकर सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, कार्यकारी अभियंता संजय कटेकर यांच्यासह महापालिकेचे अधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पंचप्राण शपथेमधील पाचही मुद्द्यांचे सविस्तर विवेचन करून प्रतिज्ञेचे महत्त्व उपस्थितांना स्पष्ट करून सांगितले, तर आयुक्त गणेश देशमुख म्हणाले की, शालेय विद्यार्थ्यांना विद्यार्थीदशेत असतानाच ज्यांच्यामुळे आपणाला स्वातंत्र मिळाले ते स्वातंत्र सैनिक कोण होते, स्वातंत्र्यसंग्रामात आपल्या शहरातील सहभागी झालेल्या स्वातंत्र्यवीरांची माहिती व्हावी या उद्देशाने शासन निर्देशानुसार स्वातंत्र्यैनिक आणि शहीद वीरांचा नामोल्लेख असणारा शिलाफलकाचे अनावरण करण्यात आले. या अभियानांतर्गत १५ व १६ ऑगस्टला माती कलश महापालिका क्षेत्रातून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात स्वातंत्र्यसैनिकांच्या नातेवाईकांना सन्मानित करण्यासाठी फुलांनी सजवलेल्या गाडीतून सन्मानपूर्वक आणणयात आले. अत्यंत भारावलेल्या वातावरणात पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील शहीद सैनिक विष्णू कदम यांच्या पत्नीचा तसेच २६ स्वातंत्रसैनिकांच्या नातेवाईकांचा मान्यवरांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी अथर्व मीडिया वर्ल्ड यांच्या सहयोगातून राहुल सोनावणे व सहकाऱ्यांनी शहीद वीरांना वंदन करीत देशभक्तीपर गीते सादर केली.

# खोपोलीतील लवजी परिसरात बिबट्याचा वावर?

## व्हिडीओ व्हायरल; नागरिक भयभीत

**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपालिका हद्दीतील लवजीच्या डोंगरावर बिबट्या आल्याचा व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल झाल्याने लवजी, चिंचवली, सुभाष नगर परिसरात ग्रामस्थ भितीचे वातावरण आहे.

खंडाळा घाटातील मंकी हिल परिसरात बिबट्याचा वावर असल्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर वायरल होत आहे, मात्र या वृत्ताला अधिकृत दुजोरा मिळत नसल्याने ग्रामस्थांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. काही ग्रामस्थांना मस्को शाळेच्या भिंतीच्या मागील बाजूस पाहिल्याचे सांगण्यात आले आहे.

याबाबत वनविभागाचे रक्षक संतोषी बाष्टेवाड संपर्क साधला असता ग्रामस्थांनी काळजी घेण्याबाबत त्यांनी आवाहन केले आहे. सायंकाळच्या वेळी डोंगर तसेच जंगल भागात एकटे जाऊ नये असेही त्यांनी सांगितले.



**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०६
Email ID : panvelcorporation@gmail.com    दूरध्वनी क्र. ०२२-२७४५८०४०/४१/४२

जा.क्र. पमपा/ मबाक /४४२३/प्र.क्र.१/ ३१ /२०२३    दिनांक :-११ / ०८ /२०२३

**:जाहीर निविदा सुचना :**

पनवेल महानगरपालिका महिला व बाल कल्याण विभागा अंतर्गत महिला व बालकल्याण विभागातर्फे पनवेल महानगरपालिका क्षेत्रात महिला सुरक्षा जनजागृती मोहिमेचे आयोजन करणेबाबत पात्र व इच्छुक ठेकेदार / पुरवठाधारक यांचे कडून सदरकामी कोरी निविदा पत्र www.panvelcorporation.com या संकेत स्थळावर दिनांक ११/८/२०२३ ते दिनांक २३/८/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहणार आहेत. सदरच्या निविदा दिनांक : २३/०८/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. निविदा धारकाने कार्यक्रमाचे आयोजन करणेकामीचे दर प्रमाणक याची माहिती मनपा ने विहित केलेल्या रकान्यात भरणे आवश्यक आहे. सदरहुन कामाचा तपशिल खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय किंमत (Estimate Cost) | EMD | निविदापत्रकाची किंमत |
|---|---|---|---|---|
| | पनवेल महानगरपालिका महिला व बाल कल्याण विभागा अंतर्गत महिला व बालकल्याण विभागातर्फे पनवेल महानगरपालिका क्षेत्रात महिला सुरक्षा जनजागृती मोहिमेचे आयोजन करणेबाबत | ९,९१,२००/- | १०,०००/- | ५००+१८%GST= रु.५९०/-मात्र |

सही/-
(भारत राठोड)
अतिरिक्त आयुक्त
पनवेल महानगरपालिका

## निवडक

### वयाळ शाळेत विद्यार्थ्यांना साहित्यवाटप



**मोहोपाडा** : सम्यक सामाजिक संस्था आणि पाताळगंगा रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने वयाळ राजिप शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या वेळी सम्यक सामाजिक संस्थेचे अध्यक्ष प्रकाश गायकवाड, पाताळगंगा रोटरी क्लबच्या अध्यक्ष रेश्मा कुरूप, पत्रकार राहुल जाधव, सम्यक सामाजिक संस्थेचे मोहन कांबळे, तायडे सर, गणेश जावळे, ग्रामपंचायत सदस्य रोशन गायकवाड, अपर्णा पवार, माजी उपसरपंच व शाखाध्यक्ष ज्ञानेश्वर पवार, माजी उपसरपंच गणेश गायकवाड, शाळाप्रमुख अनिल कदम व उपशिक्षिका शीतल रोडे उपस्थित होते.

### शुभदा पंडित यांचा गौरव



**पनवेल** : अभ्युदय को-ऑपरेटिव्ह बँक या बहुराज्य शेड्युल्ड बँकेत ३८ वर्षे विविध पदावर काम करून शुभदा पंडित या नुकत्याच सेवानिवृत्त झाल्या. त्यांनी बँकेत काम करीत असताना समाजातील विविध घटकांचे प्रश्न सोडवले आहेत. पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे कार्याध्यक्ष यशवंत मोकल, सेक्रेटरी राष्ट्रीय खेळाडू अरुण पाटकर आणि सुभाष टेंबे यांनी शुभदा पंडित यांचा त्यांचे निवासस्थानी पनवेल येथे जाऊन शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार केला आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### मोबाईल खेचून दोघे पसार

**पनवेल** : एका पादचारी व्यक्तीच्या खिशात असलेला मोबाईल दोन अज्ञात चोरट्यांनी दुचाकीवरून येऊन हिसकावून पळून गेल्याची घटना तोंढरे गाव येथे घडली आहे. दिपेन उरग (२०) हा तोंढरे गाव ते उसटणे असे चालला असताना एनएमएमटी बस स्टॉपच्या जवळ दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी चोरट्यांनी त्याला रस्त्यात अडवून जबरदस्तीने त्याच्या पॅन्टच्या खिशातून १३ हजार ३०० रुपये किंमतीचा मोबाईल हिसकावून घेतला व त्यास धक्काबुक्की करून ते पसार झाले आहेत. याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### टेम्पो-रिक्षाच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**पनवेल** : टेम्पोने रिक्षाला दिलेल्या धडकेत सोमटणे येथील निशा जनार्दन पाटील या महिलेचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी टेम्पो चालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सोमटणे येथील निशा जनार्दन पाटील (५४), जनार्दन पाटील, निखिल म्हात्रे व रिक्षाचालक परतत असताना आपटे फाट्याजवळ त्यांच्या रिक्षाला टेम्पोने धडक दिली. यात जनार्दन पाटील, निखिल म्हात्रे व रिक्षाचालक हे जखमी झाले, तर निशा पाटील यांचा मृत्यू झाला.

### गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

**पनवेल** : तालुक्यातील टावरवाडी येथील २३ वर्षीय तरुणाने राहत्या घरासमोरील झाडाला दोरीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. किशोर कमलाकर ठाकरे असे मृत तरुणाचे नाव आहे. त्याने आत्महत्या का केली याचा तपास पनवेल तालुका पोलीस करीत आहेत.

### अल्पवयीन मुलीचे अपहरण

**पनवेल** : एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फुस लावून पळवून नेल्याची घटना ओवळे गावात घडली आहे. या मुलीची उंची चार फूट दोन इंच, रंग गोरा, केस काळे लांब, कानात रिंग, अंगात पांढऱ्या रंगाचा टि शर्ट, निळ्या रंगाची जिन्स पॅट असा पेहराव आहे. या मुलीबाबत काही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी (०२२-२७४५२३३३) किंवा महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक सुषमा पाटील यांच्याशी संपर्क साधावा.

# उरणचे करंजा बंदर मच्छीमारांना वरदान!

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

मुंबईच्या ससून डॉकवरील मच्छीमार बोटींच्या संख्येत दिवसागणिक वाढ होत आहे. अपुऱ्या पडणाऱ्या जागेमुळे मच्छीमारांचे नुकसान होत असल्याने उरण येथील करंजा परिसरात नवीन बंदर उभारले गेले आहे, मात्र या बंदरासाठी मंजूर झालेला १५० कोटींचा निधी वेळेत मिळाला नसल्याने कित्येक वर्षांपासून बंदराचे काम रखडले होते. अखेरे या बंदरातून माशांची खरेदी-विक्री सुरू झाली असून नवी मुंबई, पनवेल, तसेच उरणमधील मासळीच्या खवय्यांसाठी पर्वणी ठरणार आहे.

रायगड जिल्ह्यातील मच्छीमारांना जवळच मासळीची खरेदी-विक्री करता यावी, म्हणून २०११ला करंजा येथे नवीन बंदर उभारण्यास सुरुवात झाली. अनेक अडथळ्यांची शर्यत पार केल्यानंतर १ ऑगस्टपासून करंजा बंदर सुरू करण्यात आले आहे. या बंदरामुळे मच्छीमारांनी खोल समुद्रातून पकडलेल्या मासळीचा



## बंदर कार्यान्वित झाल्याने स्थानिकांची सोय

बाजार संध्याकाळी ४ वाजल्यापासून सुरू होत आहे. त्यामुळे मच्छीमार, मासळी विक्रेत्या महिला, मासळी मार्केटवाले यांच्यासह सर्व व्यापारी, खवय्यांसाठी करंजा बंदर आता नवीन केंद्र झाले आहे.

करंजा बंदराचे काम २०११ पासून सुरू करण्यात आले. अजूनही बंदराचे बरेचसे काम बाकी आहे. त्यामुळे बंदरासाठीचा खर्च १५० कोटींवरून ३५० कोटींवर गेला आहे. अशातच सध्या करंजा बंदरात ६५ ते ७० बोटी मासळी विक्रीसाठी येत असून दीडशेपेक्षा अधिक मासळी विक्रेते बंदरात येत आहेत.

करंजा बंदराचे काम अपूर्ण असतानाही येथील मच्छिमारांनी स्वतः हे बंदर कार्यान्वित केले आहे. त्यामुळे यापुढे मुंबईत न जाता करंजा मोरासह अनेक बंदरातील मासेमारी आपल्या मासळीचा व्यवहार करीत आहेत. अत्याधुनिक करंजा बंदराचा वापर राज्यातील सर्वच मच्छीमार व मासळी खरेदी-विक्री करणाऱ्यांनी वापर करावा, असे आवाहन करंजा मच्छिमार संस्थेने केले आहे.

या बंदराचा खर्च ६४ कोटी रुपये होता, मात्र कामाला झालेला विलंब

**मुंबई बंदरावरील ताण कमी करण्यासाठी करंजा बंदराचा वापर करण्याचा निर्णय आम्ही सर्वांनी मिळून घेतला आहे. त्यामुळे येथे आर्थिक उलाढाल होणार असून स्थानिकांना रोजगार मिळणार आहे.**

**-प्रदीप नाखवा, चेअरमन, करंजा मच्छीमार सहकारी संस्था**

आणि काही तांत्रिक अडचणींमुळे बंदराचा खर्च अडीच पटीने वाढला असून १५० कोटींपर्यंत पोहचला आहे. या वाढलेल्या खर्चाची केंद्र व राज्य सरकारने अर्धी-अर्धी म्हणजेच ७५-७५ कोटी जबाबदारी उचलली असून करंजा मच्छीमार बंदराच्या कामाला सुरुवात झाली आहे, मात्र काम अद्यापही सुरू आहे. बंदराचे काम ठेकेदाराला दंड ठोठावण्यात आल्यानंतरही हलगर्जीपणामुळे अद्यापही अनेक कामे पूर्णत्वास गेलेली नाहीत.

आणखी किती कालावधी लागेल याचीही माहिती नाही. त्यामुळे बंदरांतील कामे पूर्ण झाली नसतानाही केवळ मच्छीमारांचे हित लक्षात घेत करंजा मच्छीमार सहकारी संस्थेने करंजा मच्छीमार बंदरातूनच आगस्टच्या पहिल्या आठवड्यापासून कामकाज सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

### काही अंशी काम बाकी

*दरम्यान महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाने बंदराचे काम काही अंशी झाले नसल्याने अद्याप तरी करंजा मच्छीमार बंदर मत्स्यव्यवसाय विभागाच्या ताब्यात दिले नसल्याची माहिती बंदर विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.*




**उलवे नोड : रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये शुक्रवारी इनव्हेस्टीचर समारंभ उत्साहात झाला. या वेळी संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर, जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, संस्थेचे सातारा येथील सहसचिव बी. एन. पवार, आर. पी. ठाकूर, स्कूल कमिटी सदस्य निलेश खारकर, कामोठे विभागाचे शहाजी फडतरे, मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर यांची विद्यालय आवारात टिपलेली छबी.**

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात मतदार नोंदणी उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शुक्रवारी (दि. ११) राष्ट्रीय सेवा योजना विभाग तसेच पनवेल तहसील कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार नोंदणी मोहिमेचे आयोजन केले होते.

सन २०२४ची विधानसभा तसेच लोकसभेची निवडणूक विचारात घेऊन तहसील कार्यालयाने महाविद्यालयांमध्ये उपस्थित राहून सुमारे १५० विद्यार्थ्यांना मतदानाविषयी जागरूक केले, तसेच त्यांना अर्ज देऊन ऑनलाईन तसेच ऑफलाईन पद्धतीने मतदार नोंदणी मोहीम यशस्वीरित्या पार पाडली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी या कार्यक्रमासाठी उपस्थित राहून महाविद्यालयातील सर्व विभागातील विद्यार्थ्यांना या मतदार नोंदणी मोहिमेसाठी प्रोत्साहन दिले व शुभेच्छा दिल्या. या मोहिमेचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक प्रा. प्रथमेश ठाकूर यांच्यासह अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाच्या समन्वयक प्रा. महेश्वरी झिरपे, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. प्रतीक्षा पाटील, प्रा. करिष्मा कडव, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



## ओवे पेठ येथील विकासकामे प्रगतिपथावर

### भाजप पदाधिकारी प्रभाकर जोशी यांच्या पाठपुराव्याला यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमध्ये सध्या विविध प्रकारची विकासकामे वेगाने सुरू आहेत. खारघरजवळील ओवेपेठ गाव, रांजणपाडा, धामोळे, ओवे कॅम्प, धामोळेवाडी, खुटुक बांधण, मुर्बी व प्रभाग क्र. ३च्या परिसरात सिडको व महापालिकेमार्फत विकासकामे करण्यात येत आहेत. या विकासकामांपैकी पेठपाडा येथील रायगड जि. प.शाळेचे नवीन बांधकाम पूर्ण करून लवकरच ही शाळा महापालिकेकडे हस्तांतरित करण्याबाबत महापालिकेमार्फत सांगण्यात आले असल्याचे उपअभियंता सुधीर साळुंखे यांनी पत्राद्वारे कळविले आहे.

याबाबत भाजपचे पनवेल तालुका संघटक प्रभाकर जोशी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पनवेल मनपा आणि सिडकोशी पत्रव्यवहार केला होता.

प्रभाकर जोशी व ग्रामस्थ मंडळाने महापालिकेला ओवेपेठ गाव, रांजणपाडा, धामोळे, ओवे कॅम्प, धाळेवाडी, खुटुक बांधण, मुर्बी व प्रभाग क्र. ३च्या परिसरामध्ये करण्यात येत असलेल्या विकासकामांना गती देण्याबाबत पत्रव्यवहार केला होता. त्यांच्या या मागणीला यश आले असून सिडकोमार्फत से. ३३, पेठपाडा येथील राजिप शाळेच्या नवीन बांधकाम करण्याकरिता त्यांच्या विभागामार्फत निविदा प्रक्रिया करण्यात आली होती. त्या शाळेचे बांधकाम पूर्ण करून महापालिकेस हस्तांतरित करण्याबाबत कळविले आहे, असे उपअभियंता साळुंखे यांनी पत्रात नमूद केले आहे. दरम्यान, इतर कामेही सिडको व महापालिका यांनी समन्वय साधून करावी, अशी जोशी यांची मागणी आहे.

## आठ फुटी अजगराला मिळाले जीवदान

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी जुनी पोसरी येथील सर्पमित्र



तुषार अनंता कांबळे यांना पोसरी गावातून पाटील यांनी फोन करून घराशेजारी साप असल्याचे सांगितले. तुषारने काही वेळातच पाटील यांचे घर गाठून तपासणी केली असता अजगर असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. तुषार कांबळे यांनी अजगराला पकडून तेथून त्याला सुखरूप निसर्गाचा अधिवासात मुक्त केले.


## के. गो. लिमये वाचनालयात पद्मश्री रंगनाथन यांना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

के. गो. लिमये वाचनालयात वाचनालय चळवळीचे जनक पद्मश्री एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. नीला मनोहर यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या माझी माती माझा देश या उपक्रमानुसार कार्यकारी मंडळ, कर्मचारी व वाचकांनी पंचप्रण शपथ घेतली. हिमालीनी कुलकर्णी यांनी एस. आर. रंगनाथन यांच्या कार्याची महती सांगितली. पनवेलमध्ये गेली ५० वर्षे ज्ञानशैलेंद्र वाचनालयामार्फत वयाच्या ७९व्या वर्षीही वाचन चळवळ सुरु ठेवणाऱ्या नीला मनोहर यांचा अध्यक्ष ॲड. सुनिता जोशी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ, शाल व पुस्तक भेट देऊन वाचनालयातर्फे सत्कार करण्यात आला.

या वेळी नीला मनोहर व त्यांच्या कन्या आरती मनोहर खेर यांनी आपले विचार व्यक्त केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन जयश्री शेट्ये यांनी केले.


















**पनवेल : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी कार्यक्रमाच्या समारोपानिमित्ताने माझी माती माझा देश अभियानांतर्गत शुक्रवारी पनवेल महापालिकेच्या वतीने आमदार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शहीद सैनिक आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या नातेवाईकांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास आयुक्त गणेश देशमुख, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्यासह इतर मान्यवर, अधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

## संपादकीय

# विरोधकांचे अरण्यरुदन

सर्वसाधारणपणे जिल्ह्याचे पालकमंत्री संबंधित जिल्ह्याच्या मुख्यालयात स्वातंत्र्य दिनी झेंडावंदन करतात. यंदा राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने जाहीर केलेल्या यादीत काही जिल्ह्यांचे पालकमंत्री हे अन्य एखाद्या जिल्ह्यात झेंडावंदन करणार असल्याचे दिसून आल्याने त्यावरून सत्ताधारी युतीमध्ये अंतर्गत वाद निर्माण झाल्याची ओरड विरोधकांनी पुन्हा एकदा सुरू केली आहे, मात्र विरोधकांनी सुरू केलेला हा असा आरडाओरडा प्रत्यक्षात नेहमीच अरण्यरुदन ठरतो.

**सुमारे तेरा महिन्यांपूर्वी अत्यंत नाट्यपूर्ण घडामोडी घडून महाविकास आघाडीचे तीन चाकी सरकार पडले आणि अखेर एकदाचे जनतेच्या मनातील भारतीय जनता पक्ष आणि शिंदे शिवसेनेचे युतीचे सरकार सत्तेवर आले. सत्ता हातात आल्यादिवसापासून स्वत: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वेगाने व झोकून देऊन कामाला लागले. महाविकास आघाडी सरकारच्या काळात झालेल्या प्रचंड ढिलाईमुळे अनेक कामे रखडल्याने अवघ्या प्रशासनाला वेग देण्याची गरजच होती आणि शिंदे-फडणवीस यांनी नेमके तेच केले. आपल्या कामाच्या झपाट्याने व वेगवान निर्णयांनी राज्याचा गाडा पुन्हा एकदा रुळावर आणून ठेवण्यात हे दोन्ही नेते गुंतले असताना विरोधक मात्र सत्ताधारी पक्षांमध्ये सारे काही आलबेल नसल्याची आवई अधूनमधून उठवत राहिले व अजूनही उठवत असतात. मंत्रिमंडळ विस्तारावरून त्यांच्यात कुरबुरी सुरू असून मतभेदांमुळे हे सरकार लवकरच कोसळेल अशी भाकिते करण्यात विरोधक मग्न असताना शिंदे-फडणवीस सरकारने दमदार कामगिरी करीत आपले पहिले वर्षदेखील पूर्ण केले आणि विकासकामांचा धडाका सुरूच ठेवला. गुंतवणुकीच्या संदर्भात महाराष्ट्र देशामध्ये अग्रगण्य राज्य ठरले ते काही उगाच नव्हे. हा चमत्कार केवळ तेरा महिन्यांमध्ये घडला आहे. गेल्या महिन्यात अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली शिंदे-फडणवीस सरकारमध्ये तिसरा पार्टनर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा गटदेखील सामील झाला. या गटाच्या नऊ आमदारांनी थेट मंत्रिपदाची शपथ घेतली. विरोधकांनी मग पुन्हा एकदा मंत्रिपदासाठी उत्सुक असलेले शिवसेना-भाजपचे आमदार नाराज असल्याची ओरड सुरू केली. या अंतर्गत नाराजीचा फटका शिंदे-फडणवीस-पवार सरकारला लवकरच बसेल अशी भाकिते सुरू झाली, परंतु अजित पवार यांच्यासारख्या अनुभवी नेत्याच्या सहभागामुळे राज्य सरकारच्या कामकाजाने आणखी वेग घेतला, पण विरोधक मात्र त्यांना सरकारवर टीका करण्यासाठी दुसरा कुठलाही मुद्दा मिळत नसल्यामुळे की काय सतत या तीन सत्ताधारी पक्षांतील अतंर्गत कुरबुरींचेच तुणतुणे वाजवताना दिसतात. तीन पक्षांनी एकत्र येऊन कामकाज सांभाळायचे म्हणजे काही बाबींसंदर्भात निर्णय घेताना एकमेकांशी थोडी अधिक चर्चा करण्याची गरज अधूनमधून लागू शकतेच. तीन पक्षांनी एकत्र येऊन सरकार चालविण्याचा अनुभव खरे तर विरोधी पक्षांनादेखील आहेच. कदाचित त्यांच्यातील आपापसातील कुरबुरी व मतभेदांमुळे त्यांना सगळीकडेच तसाच अनुभव येत असावा असे वाटत असेल. असो. तूर्तास येत्या १५ ऑगस्टला कुणी, कुठे झेंडावंदन करायचे यावरून महायुतीत मतभेद सुरू झाल्याची आवई उठवण्यात आली आहे. वस्तुस्थिती अशी आहे की शिंदे-फडणवीस-पवार या त्रिशूळाने महाराष्ट्राच्या कारभारावर उत्तम मोहोर उठवली आहे. या तिन्ही नेत्यांमधला आणि पक्षांमधला समन्वय दृष्ट लागण्याजोगा आहे. किंबहुना राज्याचा कारभार इतक्या चांगल्या समन्वयानिशी करता येतो हे महाविकास आघाडीतील काही नेत्यांच्या पचनी पडत नाही. त्यामुळेच सत्तेतील वाटेकरी असलेल्या तीन पक्षांमध्ये लावालाव्या करून आनंद मिळवण्याचा प्रयत्न विरोधकांकडून होताना दिसतोय.**

# स्त्री शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्त्व



स्त्री शिक्षणयत्र नार्यस्तु पूज्यन्ते
रमन्ते तत्र देवता...

ज्या ठिकाणी स्त्रीची पूजा केली जाते तेथे साक्षात देवतांचा अधिवास असतो. तशी महान शिकवण तथा स्त्रियांबद्दलचा आदर भाव आपली संस्कृती शिकवते. प्राचीन काळात तशी समाजरचनाही होती. स्त्री ही कुटुंबाचे समाजाचे महत्त्वाचे अंग आहे. ते जितके सर्वांगाने समृद्ध असेल तितकाच समाज नैतिकदृष्ट्या समृद्ध होईल.

पुरुषांबरोबर स्त्रियांच्या शिक्षणालादेखील अनन्यसाधारण महत्त्व आहे, कारण एक पुरुष शिकला तर तो फक्त एकटाच शिक्षित होतो, पण जर एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंब शिक्षित होते, सुसंस्कृत होते अशी धारणा वैदिक काळातील लोकांची होती. म्हणून तर वैदिक काळात स्त्री ही पूजनीय होती, बंधनमुक्त होती. तिला पुरुषांच्या बरोबरीने सर्व स्वातंत्र्य होते. तिनेही मिळालेल्या स्वतंत्र्याचा पूरेपूर वापर करून पुरुषांइतकीच आपली प्रतिभा वेगवेगळ्या क्षेत्रात दाखवली व इतिहासात आपले नाव अजरामर केले.

वेदकाळात मुलांच्या सोबत मुलींनाही शिक्षण मिळत असे. ब्रह्मवादिनी व सद्योद्वाहा हा असे विद्यार्थिनींचे दोन प्रकार होते. ब्रह्मवादिनी मुली आजन्म ब्रह्मचर्य पाळून वेदविद्येचा अभ्यास करत व पुरुषांप्रमाणेच अध्यापनाचे कार्य करत असत. अपाला, गार्गी, इंद्राणी, लोपमुद्रा, ईश्वरा, घोषा यांनी रचलेल्या ऋचा ऋग्वेदात आढळतात. ही जणू स्त्रियांच्या प्रतिभासंपन्नतेची साक्षच, पण काळ बदलत गेला आणि बदलत्या काळानुसार स्त्री शिक्षणाकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलत गेला. तिच्या स्वातंत्र्यावर बंधने आली तिच्या आचारविचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंधने लादण्यात आली तसेच अघोरी प्रथांमध्ये तिला जखडण्यात आले. सर्व सामर्थ्यवान स्त्री अबला ठरवण्यात आली आणि इथूनच स्त्री शिक्षणाची अधोगती सुरू झाली.

ब्रिटीश राजवटीत स्त्रियांच्या अंधारमय जीवनात थोडा आशेचा किरण दिसू लागला आणि या कालखंडात महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्त्रियांना ज्ञानाची कवाडे मोकळी केली, पण आजही आपण एकीकडे स्वतःला पुढारलेला म्हणत असलो तरी स्त्री शिक्षणाकडे बघण्याचा संकुचितपणा काही जात नाही.

देशाचा लौकिक वाढविण्यामध्ये स्त्रियांचाही सक्रिय सहभाग आहे. महिला शास्त्रज्ञ रॉकेट वूमन रितू करीधाल यांचे नेतृत्व असलेले चांद्रयान ३ चंद्रावर पाठवतो. त्याच देशात बेटी पढाओ बेटी बचाव अभियान राबवाते लागते हा केवढा विरोधाभास! मुळात अगदी शिक्षितम उच्चशिक्षित समाजातही मुलगा वंशाचा दिवा असे मानून मुलीचा जन्मच नाकारणेही पुढारलेल्या समाजाची जणू काळी बाजूच आहे. देशातील बहुसंख्य जनता ग्रामीण भागात राहते आणि ग्रामीण भागात स्त्री शिक्षणाची परिस्थिती अतिशय विदारक आहे. मुलगी परक्याचे धन ही आजही समाजाची विकृत धारणा आहे आणि दुर्दैवाने मुलींच्या संगोपनापासून ते शिक्षणापर्यंत ती डोकावते. मुलांच्या शिक्षणासाठी जागरूक असलेले पालक मुलींच्या शिक्षणाबाबत मात्र उदासीन दिसतात. म्हणून तर मुलांना अट्टाहासाने तथाकथित चांगल्या शाळांमध्ये प्रवेश घेणे, त्यांना चांगल्या शैक्षणिक सुविधा पुरविणे तुलनेने त्याच कुटुंबातील मुलींच्या शिक्षणाबाबत मात्र कमालीचे औदासीन्य दाखवतो दहावी, बारावी केले म्हणजे बस. लग्न लावून दिले म्हणजे आपली जबाबदारी संपली. पालक एकीकडे जबाबदारीतून मुक्त होतात, पण नकळत तिच्या इच्छा आकांक्षांचे पंख कुरतडण्याचेच काम करतात.

अनादी काळापासून स्त्रियांनी शिक्षित होऊन आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे समाजाने आपली मानसिकता बदलून कोणताही भेद न करता मुक्तपणे मुलींना शिकण्याचे स्वातंत्र्य दिले तर खऱ्या अर्थाने देशाची व समाजाची प्रगती होईल आणि त्यातूनच खरा सदृढ समाज निर्माण होईल, कारण स्त्री लक्ष्मी रूपाने घरात वावरते. सरस्वती होऊन मुलांचा अभ्यास घेते. दुर्गा होऊन संकटांचा सामना करते. चंडीका, कालिका होऊन घराचे रक्षण करते. गृहलक्ष्मी होऊन घराचे रक्षण करते. म्हणूनच तिला शिकू द्या.

**-ज्योती सुरेश म्हात्रे,**
**शिक्षिका, राजिप शाळा,**
**वारदोली, पनवेल**

# गणेशमूर्तिकार आणि शिल्पकार बी.आर.खेडकर

छत्रपती शिवाजी महाराज, अहिल्यादेवी होळकर, महात्मा गांधीजी, स्वातंत्र्यवीर सावरकर, अण्णाभाऊ साठे, कर्मवीर भाऊराव पाटील अशा अनेक थोर व्यक्तींचे प्रमाणबद्ध पुतळे बनवून शिल्पकलेच्या क्षेत्रात स्वतः चा ठसा उमटविणारे ज्येष्ठ शिल्पकार बी. आर. ऊर्फ अप्पासाहेब खेडकर यांचा आज जन्मदिन आहे.


नव्वद वर्षांच्या आयुष्यात अनेक शिल्पकृतींद्वारे त्यांनी आपल्या राज्याच्या कानाकोपऱ्यांत आपल्या खुणा ठेवल्या आहेत. तीन फुटांपासून साडेअठरा फूट उंचीच्या साडेचारशेहून अधिक ब्राँझ पुतळे साकारलेले खेडकर हे अव्वल दर्जाचे कलावंत होते. कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाच्या आवारातील अठरा फुटी पुतळा त्यांच्याच कसबी हातातून साकारला आहे. प्रसिद्ध शिल्पकार विनायक पांडुरंग करमरकर यांनी घडविलेल्या शिवाजी महाराजांचा पुतळा पुण्यात आहे. त्यापासून अप्पासाहेबांना प्रेरणा घेतली. १२ ऑगस्ट १९२६ रोजी जन्मलेले खेडकर यांचे बालपण गरिबीत गेले, मात्र हातात कला होती. त्यांनी गणेशमूर्ती साकारण्यास सुरुवात केली. पुण्यात सोमवार पेठेत गणेशमूर्तीचा कारखाना सुरू केला. प्रमाणबद्धता, सुबकता, रेखीवपणा यांमुळे त्यांच्या मूर्ती भाविकांच्या आवडत. पुण्यातील अनेक मंडळे गणेशमूर्ती त्यांच्याकडूनच करवून घेत. मूर्तिकामाबरोबर विविध सिनेमा कंपन्यांतील कला विभागातही ते काम करीत. या कामातून त्यांची आणि 'मुगल ए आझम'चे दिग्दर्शक के. आसिफ यांची भेट झाली. त्यांच्या शिल्पकलेचे कसब पाहून आसिफ यांनी 'मुगल ए आझम'च्या कला विभागाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली.



मुगल बादशहाचा काळ रूपेरी पडद्यावर साकारण्याला खेडकर यांची अशा प्रकारे मदत झाली आहे. याच चित्रपटात त्यांनी मधुबाला हिच्या चेहऱ्याचा रबरी मास्क हुबेहूब बनविला. एका नृत्य कलावंताने तो मास्क घालून 'प्यार किया तो डरना क्या' या गाण्यावर नृत्य केले आणि मधुबालाच्या नृत्याचा भास निर्माण केला. याच चित्रपटातील पृथ्वीराज कपूर, दिलीपकुमार, मधुबाला यांचे मोठे पुतळेही खेडकरांनी साकारले. १९६०नंतर त्यांनी चित्रपटक्षेत्राला रामराम करून शिल्पकलेला वाहून घेतले.

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बनविण्याची त्यांना प्रथम संधी मिळाली ती १९६१ साली. पहिला शाडूचा पुतळा पानशेतच्या पुरात वाहून गेला. त्यानंतर तो पुन्हा बनविला गेला आणि त्यानंतर ब्राँझचा पुतळा बनला. तो साताऱ्यात पोवई नाक्यावर आजही आहे. पुढे त्यांनी शिवाजी विद्यापीठातील पुतळा बनविला. तो उत्कृष्ट झाल्याने यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते त्यांचा सत्कार केला गेला. त्यानंतर त्यांना अनेक मान-सन्मानांनी खेडकर गौरविले गेले.

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# गुगलने प्ले स्टोअरवरून ४३ मोबाईल अ‍ॅप्स हटवले



गुगलने आपल्या Play Storeवरून ४३ मोबाईल अ‍ॅप्स हटवले आहेत, ज्यामध्ये मालवेअर किंवा व्हायरस आहे. हे अ‍ॅप्स एकूण २.५ मिलियन वेळा डाउनलोड केले गेले. या अ‍ॅप्सवर गुगल प्ले डेव्हलपर पॉलिसीचे उल्लंघन केल्याचाही आरोप आहे. फोनची स्क्रीन बंद असतानाही हे अ‍ॅप्स जाहिराती दाखवत होते.

Mc-feeने आपल्या रिपोर्टमध्ये या अ‍ॅप्सची माहिती दिली आहे. रिपोर्टमध्ये असे म्हटले आहे की, फोन बंद स्क्रीनवर जाहिराती दाखवल्याने बॅटरी जलद संपते आणि युजर्सना त्रास होतो. याशिवाय, डेटा लीक होण्याचाही धोका आहे. प्ले स्टोअरवरून काढून टाकलेल्या ४३ अ‍ॅप्समध्ये TV/DMB प्लेयर, म्युझिक डाउनलोडर आणि न्यूज आणि कॅलेंडर अ‍ॅप्सचा समावेश आहे. जास्तकरून अ‍ॅप्स मीडिया स्ट्रीमिंग आहेत. या अ‍ॅप्सवर फसवणुकीच्या कारवायांमध्ये गुंतल्याचाही आरोप आहे.

याचबरोबर या अ‍ॅप्सच्या मदतीने दूरवर बसूनही यूजरचा फोन नियंत्रित करता येऊ शकतो, असे या रिपोर्टमध्ये म्हटले आहे. हे अ‍ॅप्स लोकांचे मेसेज वाचण्यास आणि स्टोरेज पाहण्यासदेखील सक्षम होते. हे अ‍ॅप्स वापरकर्त्यांना इतर अ‍ॅप्सच्या आधी नोटिफिकेशन्स दाखवण्याची विनंती करतात. बँकिंग फसवणुकीसाठी या अ‍ॅप्सचा वापर केला जाऊ शकतो.

**टाळण्यासाठी काय करावे?**

एखाद्या विशिष्ट अ‍ॅपमुळे तुमच्या फोनची स्क्रीन वारंवार चालू होत असल्याचे तुम्हाला वाटत असेल तर सेटिंग्ज तपासा. शक्य असल्यास ते अ‍ॅप हटवा तसेच बॅकग्राउंड अ‍ॅप रिफ्रेशदेखील बंद करा. याचा फायदा असा होईल की स्क्रीन बंद झाल्यानंतर कोणतेही अ‍ॅप बॅकग्राउंडमध्ये चालणार नाही आणि तुमच्या फोनची बॅटरी लाइफही चांगली होईल. याशिवाय कोणतेही अ‍ॅप डाउनलोड करण्यापूर्वी प्ले स्टोअरवर त्याचे रिव्ह्यू नक्कीच तपासा.

# भारतीय अंतराळ युगाचे शिल्पकार डॉ. विक्रम साराभाई

भारताच्या अंतराळ संशोधनाचे पितामह आणि भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून विक्रम साराभाई ओळखले जातात. विक्रम अंबालाल साराभाई यांचा जन्म अमदावाद येथील एका संपन्न कुटूंबात १२ ऑगस्ट १९१९ रोजी झाला.

त्यांचे वडील हे एक उद्योगपती होते. त्यांचे बऱ्याच राजकीय व्यक्तिंशी त्यांचे संबध असल्याने रवींद्रनाथ टागोर, जवाहरलाल नेहरू, सरोजिनी नायडू, महात्मा गांधी आदी लोकांचे त्यांच्या घरी जाणे-येणे होते. विक्रम साराभाई यांच्या आई सरलादेवी यांनी आपल्या आठ मुलांच्या शिक्षणासाठी स्वतःची मांटेसरी पद्धतीची शाळा काढली होती. या शाळेतच विक्रम साराभाईचे शिक्षण युरोपातून आलेल्या शिक्षकांद्वारे झाले. त्याना लहानपणापासुनच गणित आणि भौतिकशास्त्र हे विषय विशेष आवडत होते. आपले बारावीपर्यंतचे शिक्षण आटपून १९३७ साली पुढील शिक्षणासाठी ते ब्रिटनमधील केंब्रिज विद्यापीठात शिकायला गेले. पण दुसरे महायुद्ध सुरु झाल्याने ते भारतात परत आले व त्यांनी बंगलोरमधील इंडियन इंस्टीट्यूट ऑफ



**निमित्त**

सायन्स मध्ये नोबेल पारितोषिक विजेते सर सी. व्ही. रामन यांच्या मार्गदर्शनाखाली वैश्विक किरणावर संशोधन केले. १९४२ साली त्यांनी भरतनाट्यम, कुचिपुडी या नृत्यकलेत पारंगत असलेल्या प्रसिद्ध नृत्यांगना मृणालिनी साराभाई यांच्याशी विवाह केला. त्यांना कार्तिकेय आणि मल्लिका ही दोन अपत्ये झाली.


१९४५ साली दुसरे महायुद्ध संपल्यावर विक्रम साराभाई ब्रिटनला गेले. १९४७ साली त्यानी 'कास्मिक रे इंवेस्टिगेशन इन ट्रापिकल लैटीट्यूड्स' वर संशोधन करून डॉक्टरेट मिळवली आणि त्याचवर्षी ते आपल्या मायदेशी परत आले. भारतात परत येउन त्यांनी ११ नोव्हेंबर १९४७ला अहमदाबाद येथे फिजिकल रिसर्च लॅबोरेटरीची स्थापना केली. हे त्यांचे पहिले पाऊल होते. पुढे जाऊन अवकाश संशोधनात विक्रम साराभाई यांनी भरीव कामगिरी केली.

विक्रम साराभाई यांनी अहमदाबाद येथील भारतीय प्रबंध संस्था (इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट) स्थापन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. १९७५ मध्ये जो पहिला अंतरिक्ष उपग्रह आर्यभट्ट अवकाशात सोडला गेला त्याची रचना विक्रम साराभाई यांच्या अहमदाबाद रिसर्च सेंटर मध्येच केली होती. आर्यभट्टच्या यशस्वी प्रक्षेपणानंतर भारताने अनेक उपग्रह अवकाशात प्रक्षेपित केले. या यशामागे साराभाई यांचे अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि खंबीर नेतृत्व ह्यांचा मोलाचा वाटा आहे.

डॉ. विक्रम साराभाई यांना सन १९६६ साली पद्मभूषण आणि १९७२ साली मरणोत्तर पद्मविभूषण हे पुरस्कार भारत सरकारतर्फे देण्यात आले. ३१ डिसेंबर १९७१ रोजी केरळ राज्यातील कोवालम येथे रात्री झोपेतच हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले.

**(साभार : विकासपीडिया)**

## क्लिक...क्लिक...!




**पनवेल : पावसाने उघडीप दिल्याने गाढेश्वर धरण परिसराचे निसर्गसौंदय खुलून दिसत आहे.** (छाया : संस्कृती पाटील)

## आरोग्य प्रहर

# रक्ताभिसरण सुरळीत करण्यासाठी 'हे' पदार्थ खा

आपल्या शरीराची रचना अतिशय कठीण आणि गुंतागुंतीची असते. शरीरातील कोणत्याही अवयवाला त्रास झाला तर त्याचा परिणाम संपूर्ण शरीरावर आणि आरोग्यावर होतो. शरीराचे कार्य नीट चालावे आणि एनर्जी रहावी यासाठी स्नायूंमध्ये रक्ताभिसरण सुरळीतपणे सुरू राहणे अत्यंत आवश्यक आहे. जर रक्ताभिसरण प्रभावित झाले, तर आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. रक्तप्रवाह नीट झाला नाही तर शरीराच्या बाहेरील अवयवांसह हृदयाशी संबंधित समस्यांचाही धोका वाढू शकतो.



बदललेली आणि बिघडलेली लाइफस्टाइल तसेच खराब खाणंपिण यामुळे रक्ताभिसणारवर विपरीत परिणाम होऊ शकतो. शरीरातील रक्ताभिसरणात अडथळे निर्माण झाले तर बधीर होणे, सूज येणे अशी लक्षणे बाहेरून दिसून येतात. तसेच या त्रासामुळे रक्तदाब, वजन वाढणे, मधुमेह यांसारख्या समस्याही उद्भवू शकतात. म्हणूनच आपल्या खाण्यापिण्याची विशेष काळजी घेणे खूप गरजेचे आहे. तसेच वेळीच डॉक्टरांनाही दाखवून घ्यावे. अशा परिस्थितीत कोणते पदार्थ फायदेशीर ठरू शकतात, ते जाणून घेऊया.

टोमॅटो-अन्नाची चव वाढवणाऱ्या टोमॅटोमध्ये लायकोपीन असते, जे हृदयासाठी फायदेशीर मानले जाते तसेच त्यातील व्हिटॅमिनमुळे रक्ताभिसरणही सुधारते.

ड्राय फ्रुटस-रोजच्या आहारात बदाम आणि अक्रोडसारख्या ड्राय फ्रुट्सचा समावेश करावा. त्यामध्ये असलेले ऑक्सीडेटिव्ह आपला स्ट्रेस कमी करतात आणि रक्ताभिसरण सुधारण्यासही मदत करतात. तसेच त्यामध्ये अनसॅच्युरेटेड फॅट असते, जे हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर असते.

या भाज्या खाव्यात-खराब रक्ताभिसरणाच्या त्रासापासून वाचण्यासाठी आहारात बीट आणि लसूण याव्यतिरिक्त हिरव्या पालेभाज्याही प्रमाणात खाव्यात. त्यामुळे रक्ताभिसरण सुधारण्यास मदत होते.

व्हिटॅमिन सीयुक्त पदार्थ-संत्र, मोसंब यांसारखी आंबट फळे आहारात समाविष्ट करा. व्हिटॅमिन सीयुक्त फळं खाणं फायदेशीर असतं.

या गोष्टींची घ्या काळजी-रक्ताभिसरण सुरळीत राहण्यासाठी चांगली जीवनशैली अंगीकारणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी आहारामध्ये बदल करावा तसेच योगासने आणि व्यायाम करणे आवश्यक आहे.

# कर्जतच्या पदरवाडीत डोंगराला तडे

## पायथ्याशी राहणारे ग्रामस्थ भयभीत; दखल घेण्याची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्याचे शेवटचे टोक असलेल्या भीमाशंकर अभयारण्यात पदरवाडी ही धनगर लोकांची वस्ती आहे. या वस्तीच्या खालील भागातील डोंगराला लांबच लांब भेग पडली असून पायथ्याशी असणाऱ्या काठेवाडी आणि बेलाचीवाडी या दोन गावांना दरड कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे. यामुळे ग्रामस्थांमध्येही भीतीचे वातावरण पसरले आहे.

भीमाशंकर अभयारण्याचा काही भाग रायगड, काही भाग ठाणे, तर मोठा भाग पुणे जिल्ह्यात आहे. या परिसरात डोंगराच्या मध्यभागी पदरवाडी ही धनगर समाजाच्या लोकांची वस्ती आहे. तेथे १० कुटुंब शेती आणि शेतीवर आधारित उत्पन्नावर उदरनिर्वाह करून राहतात. पदरवाडीचे खालच्या भागात रायगड जिल्ह्याच्या हद्दीमधील काठेवाडी आणि बेलाचीवाडी ही गावे अगदी डोंगराच्या पायथ्याशी वसली आहेत.

खालापुरातील इर्शाळवाडीत दरड कोसळून दुर्घटना घडल्यापासून



डोंगराच्या पायथ्याशी राहणाऱ्या लोकांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यात काही दिवसांपूर्वी भीमाशंकर अभयारण्यात फिरण्यासाठी गेलेल्या स्थानिक तरुणांनी पदरवाडीच्या खालील बाजूस डोंगरात पडलेली भेग पाहिली.

तेव्हापासून स्थानिकांच्या मनात भीती निर्माण झाली आहे. या डोंगराला २५०-३०० मीटर लांब अशी भेग पडली आहे. पाऊस सुरू असताना ही भेग अनेक ठिकाणी तेथील दगडांना बाजूला करीत असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे स्थानिक ग्रामस्थांनी डोंगरातील भेग पाहिली असता धोकादायक स्थितीत असल्याचे अनेकांचे म्हणणे आहे.

पदरवाडी आणि सध्या पडलेली भेग हे पुणे जिल्हा हद्दीत आहे, तर खाली पायथ्याशी असलेली गावे ही रायगड जिल्ह्यात आहेत. त्यामुळे प्रशासन त्या धोकादायक भेगांकडे कशा प्रकारे पाहणार याबद्दल स्थानिकांच्या मनात प्रश्न निर्माण झाला आहे.

भीमाशंकर अभयारण्यामधून प्रवास करणाऱ्या लोकांकडून, भाविक, ट्रेकर्स यांच्याकडून अभयारण्य विभाग कर वसूल करीत असते.



त्यामुळे अभयारण्य विभागाने डोंगरात पडलेल्या भेगांचा अभ्यास व पुढील कार्यवाही करावी, अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

# अलिबाग तालुक्यातील नारंगी ग्रामपंचायतीला आयएसओ मानांकन

**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील नारंगी ग्रामपंचायतीला आयएसओ मानांकन प्राप्त झाले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या हस्ते ग्रामपंचायतीचे सरपंच उदय म्हात्रे व ग्रामसेवक योगिता सुर्वे यांना शुक्रवारी (दि. ११) आयएसओ मानांकन प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. विशेष म्हणजे जानेवारी २०२३पासून जिल्ह्यातील १७ ग्रामपंचायतींनी आयएसओ मानांकन प्राप्त केले आहे, तसेच जिल्ह्यातील आणखी ५० ग्रामपंचायतींची आयएसओ मानांकन प्रमाणपत्र मिळविण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरू आहे.

जिल्ह्यातील ग्रामपंचायत कार्यालयाचे सुशोभीकरण, ग्रामपंचायतींचे रेकॉर्ड अद्ययावत ठेवणे, स्वच्छतागृहे बांधणे, गावात साफसफाई असणे, गावात व्यायमशाळा, स्वच्छ पाणीपुरवठा करणे, घरपट्टी पाणीपट्टी वसुली, ग्रामसभांत नियमित विषयांवर चर्चा, गावात वृक्षारोपण करणे यासह इतर शासकीय योजना



राबविण्यावर भर देण्यात येत आहे. उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना आयएसओ करण्यासाठी व्हि. एन. टेक्नो. रिसर्च प्रा. लि. कंपनीची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. या सर्व प्रयत्नांना यश मिळाले असून, जानेवारी महिन्यात जिल्ह्यातील बोरीस गुंजीस, सातिर्जे, सारळ ग्रामपंचायतींना आयएसओ मानांकन प्राप्त झाले होते. यानंतर फेब्रुवारी महिन्यात अलिबाग तालुक्यातील कामार्ली उरणमधील पुनाडे व दिघोडे तसेच पेण तालुक्यातील उंबर्डे या चार ग्रामपंचायतींना तर मार्च महिन्यात नागाव, एप्रिल महिन्यात पेण तालुक्यातील बोर्जे, कांदळे, निगडे, गागोदे खुर्द, वाक्रुड, वरप, मसद बुद्रुक, जिते तर नुकतेच अलिबाग तालुक्यातील नारंगी या ग्रामपंचायतीला आयएसओ मानांकन प्राप्त झाले आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या हस्ते शुक्रवारी ग्रामपंचायतीचे सरपंच उदय म्हात्रे व ग्रामसेवक योगिता सुर्वे यांना आयएसओ मानांकन प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. या वेळी ग्रामपंचायत उपसरपंच केतन म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य अमोल पाटील, राजेंद्र म्हात्रे, राहुल पाटील, अनिता पाटील, गुणवंती पाटील, सविता धुमाळ यांच्यासह रेश्मा म्हात्रे उपस्थित होत्या.

# वाहतूक कोंडी सुटून सामाजिक शांततेसाठी सर्वांचे सहकार्य गरजेचे

## मुरुड पोलीस निरीक्षक निशा जाधव यांचे आवाहन



**मुरूड : प्रतिनधी**

मुरूड पोलीस निरीक्षक निशा जाधव यांनी येणारे सण शांततेत साजरे व्हावेत व रस्त्यावरील वाहतूक समस्या होऊ नये व नागरिकांच्या समस्यांचे निराकरण व्हावे यासाठी व्यापारी असोसिएशनच्या सर्व व्यापाऱ्यांची बैठक घेतली. गणेशोत्सवासाठी मोठ्या संख्येने नागरिक खरेदीसाठी येत असतात. यामुळे बाजारात वाहतूक कोंडी होऊन सामाजिक शांततेचा भंग होऊ नये यासाठी वाहतूक नियोजनाची गरज आहे. त्यासाठी व्यापारी वर्गाने सहकार्य करावे यासाठी व शांतता कायम ठेवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

चर्चसत्रात व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नितीन आंबुर्ले, सचिव सुरेश जैन, पिंटू शहा, हितेंद्र पंड्या, भावेश शहा, अशोक जैन, नरेंद्र जैन, ललित जैन, पोलीस नाईक परेश म्हात्रे आदी उपस्थित होते.

पोलीस निरीक्षक निशा जाधव म्हणाल्या, बाजारात मुख्य गर्दीच्या रस्त्यावर एकेरी मार्ग, सम-विषम तारखांना पार्कींग करण्यासाठी मी स्वतः व मुख्याधिकारी पंकज भुसे प्रयत्न करणार आहोत. सीसीटीव्हीच्या सहाय्याने संबंधित नाक्यावर पोलीस स्पीकरवर चुकीची लावलेल्या गाडीचा नंबर जाहीर करतील. अशाने वाहतूक कोंडी होणार नाही.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविणेत येते की, आमचे अशील श्री. जागेश भद्रकुमार सवजानी रा. १३/बी, १३ वा मजला, संभव तिर्थ को. ऑप ही. सो, भुलाबाई देसाई रोड, मुंबई ४०० ०२६ यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकती विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

| अ.क्र | मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | मळेघर ता. पेण जि. रायगड | १५९ | ०.३२.१० | ७.५६ | श्री. बाळ शिवराम मोकल व इतर ७ |
| २. | शहाबाज ता. अलिबाग जि. रायगड | २२१ | . ०.६५.०० | ९.०६ | श्री. सुरेश पांडुरंग पाटील |

सदरहू वर नमुद केलेल्या मिळकती हया वरील विद्यमान मालकाच्या मालकी व तावे कब्जाच्या आहेत, असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ वरुन तसे दिसते. सदरहू मिळकती त्यांचेकडून आमचे अशीलांनी तदंगभूत सर्व हक्कांगासह कायम फरोक्त घेण्याची ठरविलेल्या आहेत. तरी सदरहू मिळकतींत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, साठेकरार, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क, अन्न, वस्त्र, बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खालील पत्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून फरोक्तखत रजिस्टर केले जाईल व भागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

ठिकाण :- पेण
दिनांक :-११/०८/२०२३

सही/-
ॲड निखिल अनिल भोईर

२०१-२०२, दुसरा मजला, सुशिल प्राईट, गार्डन हॉटेल बसस्टॉपच्या बाजूला, पनवेल
पिन नं. ४१०२०६ मोबाईल नंबर ८२८६२०२२७२

## MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE No. 03/2023-24**

Online bids (SRM E-Tenders) are invited for the following works from the registered contractors

| SRM E-Tender No. | RFx No. | Name of Work | Estimated Cost (In Rs.) |
|---|---|---|---|
| 11/2023-24 | 7000028195 | Annual Civil Maintenance Works 220KV ONGC, 100KV Jite, 100KV Patalganga, 100KV Bhokarpada, Takka Premises, Kalamboli Colony, Bhingari Premises for FY. 2023-24 **(IInd Call)**. | 16,97,081/- |
| 12/2023-24 | 7000028197 | Maintenance of Road, Renovation of Toilet Block, Window and Entrance Gate Repairing at 100KV Bhokarpada Substation. | 18,83,713/- |
| 13/2023-24 | 7000028196 | Repairing & Replacement of Chainlink Fencing Control Room Outside Painting Cable Trench Covers & Other Miscellaneous work at 220KV Tambati Substation | 18,53,464/- |
| 14/2023-24 | 7000028204 | Repairing and Maintenance of Type-II (4T) and Internal Painting of Type-II Staff Quarters at 400KV Nagothane. | 24,22,342/- |

For detailed information, please see SRM E-Tender section of our website **www.mahatransco.in Contact Person:** Executive Engineer (Civil), Panvel. Telephone No. (022) 27480325.

**Sd/-**
**Exeuctive Engineer (Civil)**
**Panvel**

## MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender Specification.

| RFx No. | Description | Estimated Cost |
|---|---|---|
| Tend-19/ 23-24 **7000028102** | AMC of computer & printers at various divisions and Substations under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs. 15 Lakh |
| Tend-27/ 23-24 **7000028186** | Supply of Rain suit of various sizes under EHV O&M Circle, Panvel for the Block Year 2023-26 | Rs. 3.62 Lakh |
| Tend-28/ 23-24 **7000028175** | Providing of additional jumper (T-clamp with jumper cone) to avoid breaking of jumper during critical load condition of 100kV Apta - Khopoli & 100kV Apta - Bhokarpada - Khopoli Line under Panvel, division. | Rs. 27.44 Lakh |
| Tend-30/ 23-24 **7000028191** | Supply & Installation of WTI and OTI of ICT and EHV Transformers at various Substations under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs. 28.88 Lakh |

**EMD Minimum**: Rs. 5,000/- OR **EMD:** 1% of Estimated Cost. **Submission of Bids:** From 10.08.2023 to 17.08.2023 up to 11:00 Hrs **Opening Date:** 17.08.2023 **Tender Fee:** Rs. 500/- + GST for each tender. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel. No. 022-27459624, Mob. No. 9167026131. e-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV (O&M) Circle, Panvel**

# मोबाईलद्वारे ई-पीक पाहणी करण्याचे शेतकऱ्यांना आवाहन

**चौक** : मोबाईलद्वारे ई-पीक पाहणी कार्यक्रम सुरू झालेला आहे. तालुक्यातील प्रत्येक शेतकऱ्यांनी आपल्या मोबाईलद्वारे आपल्या शेतातील पिकांची ई-पीक पाहणी करण्यासाठी नोंदणी करावी, असे आवाहन खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांनी केले आहे.




ई-पीक पाहणी पेरा हा आपल्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. हा पेरा आपल्या जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर टाकल्यामुळे शेतकरी पीक कर्ज, पीक विमा, दुष्काळी अनुदान, खरेदी विक्री व्यवहार करण्यासाठी फायद्याचे होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी रजिस्टर मोबाईलद्वारे नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन तहसीलदार आयुब तांबोळी यांनी केली आहे. काही अडचण आल्यास डाऊनलोड केलेले पहिले ॲप डिलीट करून परत नव्याने ॲप डाऊनलोड करावे, आपल्या भागातील मंडळ अधिकारी किंवा तलाठी यांच्याशी संपर्क साधावा असेही त्यांनी सांगितले.

## PANVEL MUNICIPAL CORPORATION, PANVEL

**NOTICE INVITING E-TENDER**

**Online Tenders (e-tender) for the following work are invited by The Municipal Commissioner, Panvel Municipal Corporation, Panvel from well qualified Contractors/Firms/Company (public ltd. /private ltd) & experienced Agencies for Solid Waste Management on web portal http://mahatenders.gov.in**

**Online Tender is invited for the following work up to 25/09/2023 at 15:00 PM.**

**The details can be viewed and downloaded online directly from the Web Portal http://mahatenders.gov.infrom 11/08/2023 onwards.**

| Sr. No. | Name of the Work | Time Limit for Completion (Years) | Earnest Money Deposit (EMD) | Cost of Blank Tender Form |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 4 | 5 | 6 |
| 1. | Selection of well experienced & qualified operator for door-to-door collection and transportation of municipal solid waste up to disposal site in Panvel Municipal Corporation, Panvel, Maharashtra, India. | 5 Years from the date of issue of work order. (Period of work may be extended up to two years if work is found satisfactory) | Rs.1.2crore | Rs. 5,000+ GST (non-refundable) |

1. All eligible / interested tenderers are mandated to get Digital Signature fore-tendering.
2. All the tenderers have to pay the tender fees and EMD/Bid Security through online payment Gateway only. Failing which the tender will be disqualified.
3. Tender form submitted through post/ courier shall not be accepted.
4. Right for any amendment in the Terms & Condition of Tender and the right to reject any or all offers without assigning any reason thereof is reserved with Municipal Commissioner.

**Sd/-**
**Additional Commissioner,**
**Panvel Municipal Corporation**

## MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | **Tender No. & Name of Tender** | **RFx No. 7000028192** **Tender No.:** EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-41/2023-2024. RFx E-Tender for Work of AMC for Weed Control in Substation Switchyard Premises and Pest Control in Control Room Building Premises at various Substations under EHV (O&M) Division, Panvel. **Tender Amount:** Limited to Rs. 24.50 Lakh **EMD Amount:** Rs. 24,500/- |
| 2 | **Online Downloading of the RFx** | 14.08.2023, 18:00 Hrs to 21.08.2023, 23:59 Hrs. |
| 3 | **Online Submission of the RFx** | On or Before 21.08.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | **Online Opening of the Techno-Commercial RFx** | 22.08.2023 at 11:00 Hrs (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे अशिल **सौ. महानंदा रमेश पाटील**, रा. श्रीराम कॉम्प्लेक्स, श्रीराम नगर, धरमतर रोड, वडखळ, ता. पेण, जि. रायगड यांनी दिलेल्या माहितीवरुन व त्यांनी सांगितलेप्रमाणे व त्यांनी दाखविलेल्या कागदपत्रावरुन ही जाहिर नोटीस प्रसिध्द करण्यात येते की,

माझे अशिल यांचे मालकीचे ग्रुप ग्रामपंचायत वडखळ, यांचे असेसमेंट उताऱ्यावरील वर्णनाप्रमाणे मालमत्ता ( घर ) क्र. १८७१/२, आर.सी.सी. तळमजला, श्रीराम कॉम्प्लेक्स, श्रीराम नगर, धरमतर रोड, वडखळ, ता. पेण, जि. रायगड येथे स्वत:च्या मालकीचा व्यापारी गाळा आहे.

माझे अशिल यांनी सदरचा व्यापारी गाळा दिनांक ०१/०६/२०१४ रोजी **मे. श्रीहींथा कन्स्ट्रक्शन,पार्टनर श्री. पी. सूर्यनारायण राजू,** रा. फ्लॅट नं. ८०३, श्रीराज को. ऑप. हौ. सोसा., प्लॉट नं. ३३, सेक्टर २०, खारघर, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२१० यांना ११ महिन्यांच्या मुदतीवर भाडेतत्वावर दिला होता. **मे. श्रीहींथा कन्स्ट्रक्शन,पार्टनर श्री. पी. सूर्यनारायण राजू,** यांनी सुरवातीचे काही महिने माझे अशिलांच्या वरील नमुद व्यापारी गाळयामध्ये आपला व्यवसाय केला. **मे. श्रीहींथा कन्स्ट्रक्शन,पार्टनर श्री. पी. सूर्यनारायण राजू,** यांना दरमहा भाडे रक्कम रुपये ४,०००/- ठरले होते. व डिपॉझिट म्हणून त्यांनी रक्कम रुपये १०,०००/- माझे अशिलांस रोख स्वरुपात दिले होते.

**मे. श्रीहींथा कन्स्ट्रक्शन,पार्टनर श्री. पी. सूर्यनारायण राजू,** यांनी माझे अशिलांचा सदरचा व्यापारी गाळा ०१/०६/२०१४ ते ३०/०४/२०१५ या मुदतीकरिता भाड्याने घेतला होता. मात्र त्यांनी सदर व्यापारी गाळयामध्ये त्यांच्या व्यवसायाच्या असलेल्या वस्तु सदर गाळयामध्ये तशाच ठेवून सदरच्या गाळयास बाहेरुन कुलुप मारुन निघुन गेला आहेत. माझे अशिल यांनी **मे. श्रीहींथा कन्स्ट्रक्शन,पार्टनर श्री. पी. सूर्यनारायण राजू,** यांच्याबरोबर फोनवर संपर्क करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांच्याबरोबर त्यांचा कोणताही संपर्क झाला नाही.

**मे. श्रीहींथा कन्स्ट्रक्शन,पार्टनर श्री. पी. सूर्यनारायण राजू,** यांनी सदर व्यापारी गाळा २०१४ पासून आजपर्यंत बंद स्थितीत ठेवलेला आहे. तसेच त्यांनी २०१५ नंतर माझे अशिलांचे आजपर्यंतचे भाडे रक्कम रुपये ३,८४,०००/- देणे तसेच ठेवलेले आहे. तसेच त्यांनी भाडे न देता माझ्या अशिलांची सदर मिळकत तशीच अडवून ठेवलेली आहे.

त्याबाबत माझे अशिलांनी वकीलांमार्फत दिनांक १२/०७/२०२३ रोजी लिगल नोटीस पाठविली असता सदर व्यक्ती नमुद पत्त्यावर रहात नसल्याबाबत नोटीस न बजावता परत आलेली आहे.

तरी या नोटीसीने कळविण्यात येते की, ही नोटीस प्राप्त झाल्यापासून आपण ताबडतोब सदर व्यापारी गाळयातील आपले सामान स्वत:हून घेवून जावे. आपण असे न केल्यास आपण स्वत:हून त्यावरील आपला हक्क सोडला आहे असे समजून माझे अशिलांचे मालकीचा वरील नमुद व्यापारी गाळयास आपण बेकायदेशीरपणे लावलेले कुलुप गावातील पंच यांच्या देखरेखीखाली तोडून त्या व्यापारी गाळयामध्ये मालक म्हणून प्रवेश करणार आहेत. त्यामुळे होणाऱ्या कोणत्याही नुकसानीस माझे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**पेण.**
**दि. ११/०८/२०२३**

**ॲड. आर. आर. म्हात्रे**
**परमार प्लाझा, गाळा नं. ९**
**पेण पोलीस स्टेशन जवळ,**
**ता. पेण, जिल्हा - रायगड**
**मो. नं. ९४२२६८९५९८, ७३५०८११०७५**

## निवडक

### हनुमान महाअभिषेक सोहळा



**उरण :** तालुक्यातील करंजा कोंढरी गावचे आराध्य दैवत श्री हनुमान देवतेच्या मूर्तीचे ६ मे २०२३ रोजी एका समाजकंटकांनी विटंबना केले होती. त्यानंतर संपूर्ण ग्रामस्थ यांनी ब्राह्मण सल्ल्यानुसार देवाचा अखंड सप्ताह नाम जप केले होते. त्यानंतर नुकताच संपूर्ण शास्त्रीय विधी नुसार देवाला शेंदूर लेपनाचा कार्यक्रम नुकताच करण्यात आला आणि शेंदूर विसर्जन खोल समुद्रात वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. आता येत्या २१ ऑगस्ट रोजी देवाचा महाअभिषेक सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सर्वभक्तांनी या सोहळ्याला उपस्थित रहावे, असे आवाहन गावचे अध्यक्ष प्रकाश पाटील व कमिटी यांनी केले आहे.

### चोरीला गेलेली रिक्षा मिळाली

**पनवेल :** शहर परिसरातून चोरीला गेलेली रिक्षा मानपाडा पोलिसांना सापडल्याने त्यांनी ती पुन्हा शासकीय पूर्तता करून रिक्षा मालकाच्या ताब्यात दिली आहे. पनवेल शहरातील लोखंडी पाडा, अशोक बाग परिसरात नवनाथ खांडपेकर यांनी त्यांची रिक्षा (एमएच ४६ एससी ३६८०) चोरून नेल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली होती. दरम्यान, मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक रिक्षा बेवारस स्थितीत उभी करून आढळल्याने त्यांनी ती ताब्यात घेतली. याबाबत चौकशी केली असता ती पनवेल येथून चोरी झाल्याची माहिती मिळाली. त्यानुसार रिक्षामालकाला बोलावून शासकीय पूर्तता करून ती रिक्षा मूळ मालकाच्या ताब्यात देण्यात आली.

### वीर वाजेकर महाविद्यालयात कार्यशाळा



**उरण :** रयत शिक्षण संस्थेचे वीर वाजेकर महाविद्यालयात बुधवारी (दि. ९) टी. वाय. बीए., टी. वाय. बी. एससी. सुधारित अभ्यासक्रमाची कार्यशाळा भूगोल अभ्यास मंडळ, मुंबई विद्यापीठ आणि वीर वाजेकर ए. एस. सी. कॉलेज फुंडे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.जी. पवार यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यशाळेसाठी भूगोल अभ्यास मंडळातील दोन सदस्यांनी सहभाग नोंदवला. केएमसी कॉलेज खोपोली भूगोल विभागप्रमुख डॉ. उत्तमकुमार गाडे आणि सी. डी. देशमुख कॉलेज रोहा भूगोल विभागप्रमुख डॉ. अनिल शिंदे यांच्यासह जिल्ह्यातील २२ प्राध्यापकांनी सहभाग नोंदवला. १० पेपरसाठी वेगवेगळ्या संसाधन व्यक्तींनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे निमंत्रक प्रा. दिलीप केंगार आणि या समन्वयक प्रा. राजकुमार कांबळे होते. या कार्यशाळेसाठी कला शाखेचे इन्चार्ज प्रा. डॉ. विलास महाले, प्राध्यापक, विद्यार्थी संशोधक उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. बळीराम पवार यांनी केले.



**रसायनी : आपटा येथील सर्पमित्र मनोहर कुलकर्णी यांनी अडचणीत असलेल्या नागास बाहेर काढून नंतर पकडून जंगलात सोडले. पावसाळ्यात या भागात नेहमीच साप दिसतात, पण जे आडचणीत असतात घरात असतात तेव्हा त्यांना पकडून सोडले जाते.** (छाया : बी. एस. कुलकर्णी)

# गणेशोत्सवाचे सुनियोजित आयोजन करावे

## विशेष बैठकीत नवी मुंबई आयुक्त राजेश नार्वेकर यांचे निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात गणेशोत्सव व नवरात्रोत्सव अत्यंत उत्साहात मोठ्या प्रमाणावर साजरे केले जातात. उत्सव आयोजन करताना घ्याव्या लागणाऱ्या आवश्यक परवानगीबाबत सूसुत्रता असावी व नागरिकांना त्या सहजपणे उपलब्ध व्हाव्यात यादृष्टीने नवी मुंबई मनपा आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये ऑनलाईन परवानगी प्रणाली, विसर्जन व्यवस्था, कृत्रिम तलाव निर्मिती व इतर सुविधा अशा विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. स्वातंत्र्यदिनानंतर विभाग अधिकारी स्तरावर विभागीय क्षेत्रातील गणेशोत्सव मंडळांची बैठक आयोजित करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.



बैठकीला अतिरिक्त आयुक्त विजयकुमार म्हसाळ, परिमंडळ १चे उपआयुक्त सोमनाथ पोटरे व परिमंडळ २चे उपआयुक्त डॉ. श्रीराम पवार, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे, उदयान विभागाचे उपआयुक्त दिलीप नेरकर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे, अतिरिक्त शहर अभियंता शिरिष आरदवाड, सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. धनवंती घाडगे आणि सर्व विभागांचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी, तुर्भे विभागचे सहाय्यक पोलीस आयुक्त राहुल गायकवाड, वाहतूक पोलीस विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त सुनील बोंडे आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

यावर्षी १९ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर या कालावधीत गणेशोत्सव होत असून मंडळांना उत्सवासाठी मंडप उभारणीकरिता परवानगी देण्याची महापालिकेने राज्यात प्रथमतः विकसित केलेली ई-सेवा प्रणाली लवकर सुरू करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. या प्रणालीद्वारे पोलीस, वाहतूक पोलीस, अग्निशमन या विभागांच्या ना हरकत प्रमाणपत्रासह मंडळांनी अर्ज दाखल केल्यानंतर विभाग कार्यालयामार्फत जलद तपासणी करुन विनाविलंब परवानगी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी असे निर्देश आयुक्तांनी परिमंडळ विभागप्रमुखांसह विभाग अधिकाऱ्यांना दिले. लेखी परवानगी प्राप्त झाल्याशिवाय कोणत्याही प्रकारची मंडप उभारणी केली जाऊ नये, असेही स्पष्ट करण्यात आले.

विसर्जन स्थळावरील बॅरीकेटींग, विद्युत व्यवस्था, पर्यायी जनरेटर व्यवस्था, विसर्जनासाठी तराफे व्यवस्था, श्रीमूर्ती विसर्जनासाठी स्वयंसेवक नियुक्ती, कृत्रिम तलावांच्या ठिकाणची व्यवस्था, मुख्य विसर्जन स्थळांवर स्टेज व ध्वनीक्षेपक व्यवस्था, कृत्रिम व नैसर्गिक अशा सर्व विसर्जनस्थळांवर सुके व ओले निर्माल्य कलश व्यवस्था, निर्माल्य वाहतुकीसाठी स्वतंत्र वाहन व्यवस्था, मुख्य विसर्जनस्थळी वैद्यकीय पथक व्यवस्था, अग्निशमन व्यवस्था अशा सर्वच बाबींचा आयुक्तांनी बारकाईने आढावा घेतला.

उद्यान विभागाने सर्व विसर्जन स्थळांकडे जाणाऱ्या मार्गांची प्रत्यक्ष पहाणी करून विसर्जन स्थळाकडे जाणाऱ्या मूर्तींना अडथळा होणार नाही अशाप्रकारे वृक्षछाटणी करण्याचेही निर्देश आयुक्तांनी दिले.

## कांदळवन संवर्धनाच्या अनुषंगाने सर्व यंत्रणांनी समन्वय ठेवावा –डॉ. महेंद्र कल्याणकर



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कांदळवन संरक्षण व संवर्धनाच्या अनुषंगाने शासकीय यंत्रणांनी समन्वय ठेवून पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये यासाठी प्रयत्न करावे, अशा सूचना कोकण विभागीय आयुक्त महेंद्र कल्याणकर यांनी दिल्या.

कोकण विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात कांदळवन संरक्षण व संवर्धनाच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस अप्पर प्रधान वनसंरक्षक(कांदळवन) एस. व्ही. रामराव उपस्थित होते.

कांदळवन संरक्षण व संवर्धनाच्या अनुषंगाने सर्व शासकीय यंत्रणा, संस्था, अधिकारी यांनी योग्य समन्वय ठेवून तत्परतेने आपल्या जबाबदाऱ्या पार पाडाव्यात तसेच पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये यासाठी विशेष प्रयत्न करावे अशा सूचना दिल्या.

कांदळवनाच्या बाधित क्षेत्रावर तज्ज्ञांच्या सल्ल्याने पुनर्स्थापना करणे, तसेच या संदर्भातील तक्रारींचे निवारण करण्यासाठी मध्यवर्ती नियंत्रण कक्षासह एक स्वतंत्र जिल्हास्तरीय व्यवस्थापन कक्ष तयार करणे, त्याचबरोबर भारतीय वन अधिनियम १९२७, वन(संवर्धन) अधिनियम १९८० व पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६चा भंग होणार नाही याची दक्षता संबंधितांनी घ्यावी, असेही बैठकीत सांगितले.

या वेळी रामराव यांनी उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांच्या अंमलबजावणीबाबतच्या मासिक बैठकीच्या आढाव्याचे ईतिवृत्त कोकण विभागीय आयुक्तांच्या संकेतस्थळावर नियमित प्रसिद्ध करणे, राज्यातील संवेदनशील कांदळवन क्षेत्र निश्चित करून या क्षेत्रावर पोलीस यंत्रणा, वनसंरक्षक, महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे सुरक्षारक्षकांमार्फत निगराणी ठेवणे, कांदळवन क्षेत्रात वाहनांना प्रवेशबंदी करण्यासाठी उपाययोजना करणे, या क्षेत्रात सीसीटिव्ही बसविणे, कांदळवन क्षेत्रावर उपग्रहाद्वारे निगराणी ठेवून काही बदल निदर्शनास आल्यास समितीने त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी.

या कामांचा वेळोवेळी आढावा घेण्यात येईल, अशा सूचना रामराव यांनी या वेळी दिल्या. कांदळवन संदर्भातील विविध विषयांवर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

## उरण पूर्व विभागातील बांधबंदिस्ती फुटल्याने हजारो एकर शेतीत खारे पाणी



**उरण : प्रतिनिधी**

उरण पूर्व विभागातील पिरकोन, आवरे, गोवठणे, बांधपाडा–खोपटे ग्रामपंचायत हद्दीतील पारंगीखार, सांगपाले खार, काशी, पारंगी, रेवचा वळाखार या खाडीकिनाऱ्यावरील बांधबंदिस्ती समुद्रातील उधाणाच्या पाण्यात उद्ध्वस्त झाली आहे. त्यामुळे समुद्रातील खारे पाणी हे शेतीत शिरल्याने नापीक होण्याचा धोका निर्माण झाला आहे. या संकटामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

तालुक्यातील खाडीकिनाऱ्यावरील भातशेतीचे संरक्षण करणारी बांधबंदिस्ती वारंवार उद्ध्वस्त होत आहे. त्यामुळे समुद्रातील खारे पाणी हे शेतजमिनीत शिरूर पिरकोन, आवरे, गोवठणे, बांधपाडा (खोपटा) ग्रामपंचायत हद्दीतील पारंगी, सांग पाले खार, काशी, पारंगी, रेवचा वळाखार या परिसरातील हजारो एकर भातशेती नापीक होण्याचा धोका निर्माण झाला आहे. शासनाने भातशेती वाचविण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

**आवरे, गोवठणे, बांधपाडा, पिरकोनसारख्या इतर ग्रामपंचायत हद्दीतील खाडीकिनाऱ्यावरील बांधबंदिस्ती फुटल्याने समुद्राचे पाणी हे भातशेतीत शिरले आहे. त्या संदर्भात खारलँड विभागाकडून पाहणी करून तशा प्रकारचा अहवाल वरिष्ठांकडे पाठविण्यात आला आहे.**

**–सुरेश सावंत,**
**कार्यकारी अभियंता, खारलँड विभाग, पेण**

१९ जुलैच्या पुरामुळे पूर्व विभागातील पिरकोन, आवरे गोवठणे, बांधपाडा, सारडे, वशेणी, पुनाडे, मोठी जुई, चिरनेर, विंधणे ग्रामपंचायत हद्दीतील खाडीकिनाऱ्यावरील बांधबंदिस्ती फुटल्याने समुद्रातील खारे पाणी हे भातशेतीत शिरले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. महसूल विभागाने शेतकऱ्यांना लवकरच लवकर नुकसान भरपाई द्यावी आणि खारलँड विभाग पेण कार्यालयातील अधिकारी वर्गाने शेतीची पाहणी करून तातडीने खाडीकिनाऱ्यावरील बांधबंदिस्तीची कामे मार्गी लागण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

## कवच २०२३ सायबर सिक्युरिटीचे हॅकाथॉन उत्साहात




**पनवेल, मोहोपाडा : वार्ताहर**, प्रतिनिधी

कवच २०२३ सायबर सिक्युरिटी हॅकाथॉनचे उद्घाटन नोडल सेंटर नवीन पनवेल येथे महाराष्ट्र डीटीईचे संचालक डॉ. विनोद मोहितकर यांच्या हस्ते झाले. या वेळी एआयसीटीईचे सल्लागार डॉ. आर. उन्नीकृष्णन या वेळी उपस्थित होते.

या कार्यक्रमात पिल्लई कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, नवीन पनवेल यांनी यजमान म्हणून काम केले आणि २२ सहभागी संघ आणि मूल्यांकनकर्त्यांना सर्व तांत्रिक सहाय्य आणि आदरातिथ्य प्रदान केले. स्पर्धेच्या ३६ तासांच्या यशस्वी पूर्ततेवर मूल्यांकनकर्त्यांनी त्यांच्या परस्परसंवादावर आणि त्यांच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीवर आधारित विजेत्यांची निवड करण्यात आली. दरम्यान झालेल्या या समापन समारंभात कवच २०२३च्या विजेत्यांची घोषणा करण्यात आली.

स्पर्धेत प्रत्येक विजेत्या संघाला एक लाख रुपयांचे रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या वेळी सीईओ डॉ. के. एम. वासुदेवन पिल्लई, सीओओ डॉ. प्रियम पिल्लई, आयपीएस संजय शिंत्रे, सल्लागार डॉ. आर. उन्नीकृष्णन, प्रादेशिक सल्लागार चेए, इनोव्हेशन सेल डॉ. सौरभ निर्मळे, ऋषिकेश आघाव, प्राचार्य डॉ. संदीप जोशी, संचालक पीआर, एमईएस डॉ. निवेदिता श्रेयांस, आणि डॉ. रिचा अग्रवाल आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमात डॉ. वासुदेवन पिल्लई म्हणाले की, सरकार आता आयआयटी आणि एनआयटी व्यतिरिक्त खाजगी संस्थांना संशोधन निधी मंजूर करण्यात रस घेत असल्याचे सांगितले, तर डॉ. प्रियम पिल्लई यांनी सहभागींना भर देत कवच २०२३चा ग्रँड फायनल हा फायनल नाही आणि अंतिम पराकाष्ठा उत्पादनातच असली पाहिजे. आयपीएस संजय शिंत्रे यांनी सांगितले की, सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या धोक्याला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महापे उद्योग विकास महामंडळाच्या मिलेनियम बिझनेस पार्कमध्ये महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प सुरू केला आहे.

यामुळे सायबर क्राईममधील विद्यार्थ्यांना इंटर्नशिपही मिळेल, असे सांगितले.

## वाशी येथे जागतिक ओआरएस दिवस

**नवी मुंबई : बातमीदार**

दरवर्षी ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात संपूर्ण सात दिवस जागतिक स्तनपान सप्ताह साजरा केला जातो. आदित्य हेल्थ ण्ड एज्युकेशन सोसायटी नवी मुंबई संचलित प्रतिभा इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग, नवी मुंबईचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रतिक तांबे व नमुंमपा सार्वजनिक रुग्णालय वाशी मुख्य अधिसेविका रिचेल पटनिगीरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिभा इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंगच्या परिचर्या विद्यार्थ्यांनी नवी मुंबई महापालिका सार्वजनिक रुग्णालय वाशी येथे जनजागृती व स्तनपान सप्ताह व जागतिक ओआरएस (ओरल रिहायड्रेशन सॉल्ट) दिवसदेखील साजरा केला.

ओरल रिहायड्रेशन सॉल्टचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी आणि त्याबद्दल लोकांना जागरूक करण्यासाठी दरवर्षी ओआरएस दिवस साजरा केला जातो. केवळ अतिसारासाठीच नव्हे तर शरीरातील पाण्याच्या कमतरतेवर मात करण्यासाठी ओआरएसच्या महत्त्वाविषयी लोकांमध्ये जागरूकता पसरवणे हा यामागचा उद्देश आहे.

प्रतिभा इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग, नवी मुंबईच्या विद्यार्थ्यांनी नवी मुंबई महापालिका सार्वजनिक रुग्णालय वाशी येथे स्कीट, रोल प्ले, पोस्टर व रांगोळी स्पर्धेच्या माध्यमातुन ओआरएस बाबत जनजागृती केली. या वेळी रुग्णालयाच्या मुख्य अधिसेविका रिचेल पटनिगीरे, डॉ. माधवी इंगळे, सिनिअर परिचर्या स्टाफ कळसकर व प्रतिभा इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंगच्या प्राचार्या रत्ना देवरे, शिक्षिका प्रिया जाधव व परिचर्या विद्यार्थींनी उपस्थित होत्या.



## चिरनेर आदिवासी आश्रम शाळेत क्रांती दिन



**उरण : वार्ताहर**

तालुक्यातील चिरनेर आदिवासी आश्रमशाळेत क्रांतीदिन आणि आदिवासी जागतिक दिन साजरा करण्यात आला. प्रारंभी विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आश्रमशाळा ते हुतात्मा स्मारक अशी प्रभात फेरी काढून हुतात्मा चौकातील हुतात्म्यांच्या शिल्पचित्र स्मृतींना अभिवादन केले.

कार्यक्रमात माझी माती माझा देश या उपक्रमांतर्गत कार्यक्रमात पंचप्राण शपथ घेण्यात आली. पंचप्राण शपथेचे वाचन उपशिक्षिका साधना शिंदे यांनी केले. त्यानंतर देशासाठी बलिदान देणाऱ्या १३ आदिवासी बांधवांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

आदिवासींना मिळणाऱ्या त्यांच्या हक्कांविषयी तसेच सेवा सुविधा आणि त्यांच्यासाठी असणाऱ्या योजना आणि त्याचा लाभ आदिवासी बांधवांनी कसा घ्यावयाचा याविषयी मुख्याध्यापक आप्पासाहेब मोरे यांनी विस्तृत माहिती दिली, तर कार्यक्रमात आदिवासींच्या पारंपारिकतेचे महत्त्व विशद करण्यात आले.

या वेळी शूरवीरांच्या पावन स्मृतींचे स्मरण करीत त्यांच्या शौर्याला अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाला माजी केंद्रप्रमुख अशोक कांबळे, मुख्याध्यापक आप्पासाहेब मोरे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपशिक्षक महादेव डोईफोडे यांनी केले.

## माझी माती, माझा देश अभियान!

# रोह्यात स्वातंत्र्यवीर, माजी सैनिकांचा सन्मान



**रोहे : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त देशभर माझी माती, माझा देश अभियान राबविण्यात येत असून या अंतर्गत वीरांना वंदन या उपक्रमात रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वतीने स्वातंत्र्यसैनिक आणि माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला.

ज्येष्ठ नागरिक सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास माजी उपनगराध्यक्ष महेंद्र गुजर, महेश कोलटकर, नगर परिषद अधिकारी निवास पाटील, ओंकार भुरण, रचना पार्टे, प्रसाद शिंदे, उदयनाथ ठाकरे, आनंद बंडगर, राजेश सांबरे, मदन शिवशरण, रवींद्र आयनोडकर यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

या वेळी १२ स्वातंत्र्यसैनिक, त्यांचे नातेवाईक आणि माजी सैनिकांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला तसेच त्यांना राष्ट्रध्वज देण्यात आले.

मोमीन यांनी स्वातंत्र्यसैनिक व माजी सैनिक यांचा सत्कार, आदर व्यक्त करणे हे आमचे कर्तव्य आहे. त्यांचे देशासाठी मोठे योगदान आहे असे सांगत उपस्थितांना पंचप्राण शपथ दिली.

## अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन येथे कृत्रिम भित्तिका स्थापनेबाबत कार्यक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत कृत्रिम भित्तिका स्थापनेबाबत अलिबाग, मुरूड व श्रीवर्धन येथे मच्छिमारांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमाला तिन्ही तालुक्यातील नौका मालक, तांडेल, खलाशी व संस्था पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते.

मच्छिमारांना कृत्रिम भित्तिकांची उभारणी करण्यासाठी समुद्रातील योग्य जागा निवड करण्यासाठी या कार्यक्रमांमुळे सुकर जाईल, असे जाणवले, कारण त्यांनी कार्यक्रमात अनेक प्रश्न विचारुन कृत्रिम भित्तिका या शास्त्रीय संकल्पनेची माहिती जाणून, समजून घेण्याचा प्रयत्न केला. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील २५०–२६५ मच्छिमारांनी प्रतिसाद दिला. विशाखापट्टणम प्रादेशिक केंद्राचे प्रधानशास्त्रज्ञ डॉ. जो. किझाकुडन व त्यांच्या चमूने अनमोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास राज्याचे मत्स्यव्यवसाय आयुक्त व मुंबई विभाग सहआयुक्त देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली परवाना अधिकारी, श्रीवर्धन, मुरूड, अलिबाग कार्यालयीन अधिकारी, सागरमित्र व सुरक्षा रक्षक कार्यरत होते. याबाबत संपर्कासाठी अधिकारी सं. वा. पाटील, सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, रायगड–अलिबाग; दूरध्वनी क्र. ०२१४१–२९५२२१ आहे.

या कार्यक्रमांमध्ये रायगड अलिबाग मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्त संजय वामन पाटील यांनी मच्छिमारांनी कृत्रिम भित्तिका उभारण्यासाठी व त्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी गावनिहाय समिती तयार करण्याचे आवाहन केले.

## स्वत:ला बदलायला शिका, जग आपोआप बदलेल!

■ सत्यानंद गायतोंडे यांचा विद्यार्थ्यांना अनमोल संदेश



**महाड : प्रतिनिधी**

प्रत्येकाने आपल्या जीवनात प्रथम स्वतःमध्ये बदल केला पाहिजे. मग जग आपोआपच बदलेल, असा अनमोल सल्ला कॅनडा पोलीस दलातील टास्क फोर्सचे प्रमुख सत्यानंद गायतोंडे यांनी विद्यार्थ्यांना दिला. महाडमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या एनसीसी रँक पदवीदान आणि व्यक्तिमत्व विकास कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

एनसीसी विद्यार्थी तसेच महाविद्यालयाच्या वतीने सत्यानंद गायतोंडे स्वागत प्राचार्य डॉ. आरती वानखेडे यांनी केले. या वेळी गायतोंडे यांनी एनसीसी विद्यार्थ्यांना पदक पदवीदान केले. त्यांनी आपल्या जीवनामध्ये व्यक्तिमत्व विकास कसा करायचा याचे उदाहरणासह स्पष्टीकरण दिले. आपल्या सहज सोप्या भाषेमध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना समोरील व्यक्तीशी संभाषण कसे करायचे? कोणत्या वेळी कोणता शब्द वापरायचा हे सांगताना त्यांनी प्रत्येकाने स्वत:मध्ये बदल करणे शिकले पाहिजे. जग आपोआप बदलेल असे सांगितले. जमिनीला आपण धरती माता म्हणतो आणि तिथेच पान खाऊन पिचकारी मारतो, कचरा टाकतो हे बरोबर नाही. प्रत्येकाला यशस्वी होण्यासाठी संपत्तीची गरज नसते, पण प्रत्येकाला आत्मसंघर्ष करावा लागतो तरच माणूस यशस्वी होईल, असेदेखील स्पष्ट केले.

प्रत्येक व्यक्तीने जीवनात कितीही मोठे झालो तरी आपल्या देशाचा, संस्कृतीचा आणि भाषेचा अभिमान बाळगला पाहिजे, असा मौलिक सल्लाही त्यांनी या वेळी दिला.

**महापुरुषांचे विचार प्रेरणा देतात**

महाड या ऐतिहासिक भूमीमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे भाग्य लाभले असून महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि कार्य यामुळे उभे राहण्याची प्रेरणा मिळाल्याचे सांगितलं. आपल्या कष्टमय जीवनामध्ये त्यांनी अथक परिश्रम घेत भारताचे राज्यघटना लिहून देशातच नव्हे तर देशाबाहेर देखील भारताचे नाव नेले आहे यामुळे कॅनडासारख्या राज्यात काम करताना मला कायम अभिमान वाटतो.



## माणगाव नगरपंचायत कार्यालय येथे पंचप्राण शपथ कार्यक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**

नगरपंचायत कार्यालयात पंचप्राण शपथ कार्यक्रम बुधवारी (दि. ९) क्रांती दिनाच्या दिवशी घेण्यात आला.

या कार्यक्रमाला नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, उपनगराध्यक्ष राजेश मेहता, स्वच्छता समिती सभापती दिनेश रातवडकर, माजी उपनगराध्यक्ष सचिन बोंबले, नगरसेवक अजित तार्लेककर, मुख्याधिकारी संतोष माळी आदींसह कर्मचारी व ज्ञानदीप सार्वजनिक वाचनालयाचे कर्मचारी उपस्थित होते.

## विविध महाविद्यालयांत ‘माझी माती, मेरा देश’

**रोहे : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या सांगता सोहळ्यानिमित्त केंद्र शासनाच्या सूचनेनुसार रायगड जिल्ह्यात माझी माती माझा देश अभियानाला सुरुवात झाली आहे. हे अभियान १५ ऑगस्टपर्यंत सुरू राहणार आहे. मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक प्रा. सुधीर पुराणिक, विशेष कार्याधिकारी प्रा. सुशिल शिंदे व कार्यक्रम अधिकारी प्रा. रमेश देवकर यांच्या मार्गदर्शनाने विविध महाविद्यालयांनी पंचप्राण शपथ घेतली व वृक्षारोपण केले.



या अभियानात जे. एस. एम. महाविद्यालय अलिबाग, अंजुमन इस्लाम डिग्री महाविद्यालय मुरूड, पिल्लई महाविद्यालय पनवेल, कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय कर्जत, एलएसपीएम महाविद्यालय चोंढी अलिबाग, जे. एम. वेदक आयटी महाविद्यालय तळा, द. ग. तटकरे महाविद्यालय माणगाव, वसंतराव नाईक महाविद्यालय म्हसळा, डी. जी. तटकरे महाविद्यालय तळा, कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय कर्जत, डी. डी. विसपुते महाविद्यालय पनवेल, टिकमभाई मेहता महाविद्यालय माणगाव, आचार्य इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी शेलू, केएमसी महाविद्यालय खोपोली, अभिनव महाविद्यालय कर्जत, जे. एम. वेदक विज्ञान महाविद्यालय तळा, के. एल. इ. महाविद्यालय कळंबोली, हिरवळ महाविद्यालय महाड, डॉ. नानासाहेब धर्माधिकारी महाविद्यालय कोलाड, सुंदराराव मोरे महाविद्यालय पोलादपूर, कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय उरण, वसंतराव नाईक महाविद्यालय मुरूड, गोखले एज्युकेशन सोसायटीचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय श्रीवर्धन, आनंदीबाई विज्ञान महाविद्यालय नागोठणे, डॉ. चिंतामणराव देशमुख वाणिज्य व सौ.कुसुमताई ताम्हाणे महाविद्यालय, रोहा व शेठ ज. नौ. पालिवाला महाविद्यालय,पाली या महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता.

## शहीद जवानांना मानवंदना देण्यासाठी शिलाफलक अनावरण




**रोहे : प्रतिनिधी**

माझी माती, माझा देश या उपक्रमांतर्गत रोहा नगर परिषदेच्या वतीने अहिल्यादेवी पुष्करणी उद्यान येथे देशाच्या रक्षणाकरिता आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शहीद जवानांना मानवंदना स्वरूपात शिलाफलक अनावरण बुधवारी (दि. १०) माजी सैनिक हेमंत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास राष्ट्रवादी शहर अध्यक्ष माजी अमित उकडे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, महेंद्र दिवेकर, नगर परिषद अधिकारी निवास पाटील, ओंकार भुरण, सुधीर भागत, प्रशांत माने, स्वप्नील तोडणकर, रचना पार्टे, प्रसाद शिंदे, उदयनाथ ठाकरे, आनंद बंडगर, राजेश सांबरे, मदन शिवशरण, रुपेश पाटील, रवींद्र आयनोडकर, विनोद सावंत आदींसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांना मोमीन यांनी शपथ दिली.

## माणगावच्या वनवासी कल्याण आश्रमशाळेत विविध कार्यक्रम



**माणगाव : प्रतिनिधी**

वनवासी कल्याण आश्रम संचलित माणगाव येथील कै. सौ. विजया गोपाळ गांधी अनुदानित प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेत बुधवारी (दि. ९) आदिवासी दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या वेळी आदिवासी जागतिक दिनाची माहिती देणारे व्याख्यान, विद्यार्थ्यांची फेरी काढण्यात आली होती. बँडपथकाच्या तालावर विद्यार्थ्यांच्या विविध घोषणांनी सारा परिसर दुमदुमला होता. दुपारी आदिवासी क्रांतीकारकांवर आधारित भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट भाषण व चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास संकुल समिती सहसचिव रवींद्र पाटील, कल्याण आश्रम जिल्हा सचिव मनोज कामत आदी उपस्थित होते. माजी आदिवासी विकासमंत्री अशोक उईके, भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार धैर्यशील पाटील, भाजप नेते वैकुंठ पाटील यांनी सदिच्छा भेट दिली.

# विकास व सामाजिक बांधिलकी जपणारा महसूल सप्ताह

शासनाचे लाभ सर्वसामान्यांपर्यंत नेणारा महसूल सप्ताह नियोजनबद्ध पद्धतीने रायगड जिल्ह्यात करण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली महसूल विभागाची संपूर्ण यंत्रणा यामध्ये समरस झाली आणि सुरु झाला जनसामान्यांसाठी करण्यात येणाऱ्या कार्याचा शुभारंभ.





या वर्षी प्रथमत:च महसूल दिन हा एक दिवसात होणारा कार्यक्रम सात दिवस चालणाऱ्या उपक्रमात बदलला. नियोजनासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि महसूलमंत्री राधाकृष्ण विखे–पाटील यांच्या सूचनांनुसार सात दिवसांमध्ये होणाऱ्या विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी विभागातील अधिकाऱ्यांबरोबर विचारमंथन करून महसूल सप्ताहच्या सातही दिवसात होणाऱ्या कार्यक्रमांच्या सप्तरंगी उपक्रमांची आखणी करण्यात आली.

उपक्रमाचा शुभारंभ १ ऑगस्ट रोजी झाला या दिवशी विविध कार्यक्रमांचे आयोजन करताना ४०६ तलाठी कार्यालयांमार्फत एकाच दिवशी चावडीवरुन झालेला कार्यक्रम मोठ्या प्रमाणात यशस्वी झाला. ११ हजार जणांचा सहभाग करुन घेत शासनाच्या योजनांची माहिती पोहोचवण्यात आली. योजनांची माहिती सांगताना त्याचा लाभ घेण्यासाठी पात्र व्यक्तींना आवश्यक कागदपत्रे, अर्ज यांची माहिती देण्यात आली.

उपक्रमाची वाटचाल नियोजनबद्ध पद्धतीने सुरू झाल्याने विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनानुसार यासाठी उपविभागीय पातळीपासून, तहसील व तलाठीस्तरापर्यंत नोडल अधिकारी नेमण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयातील उपजिल्हाधिकारी, नोंदणी व मुद्रांकमधील उपनिबंधक कार्यालयातील अधिकारी, भूमिअभिलेख विभागातील अधिकारी या महसूल विभागाच्या सर्व शाखांना उपक्रमात सामावून घेण्यात आले. अपर जिल्हाधिकारी सुनिल थोरवे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली.

दुसऱ्या दिवशी २ ऑगस्ट रोजी युवासंवाद कार्यक्रमाने मोठी उंची गाठली. पनवेल येथील कार्यक्रमासाठी स्वत: विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी उपस्थित राहिल्याने उपक्रमाचे महत्त्व आणि उद्देश अधारेखित झाला. शासकिय यंत्रणेतील अधिकारी कर्मचाऱ्यांबरोबर उपक्रमात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांचा, नागरिकांचा उत्साह वाढू लागला. युवासंवाद कार्यक्रमाचे जिल्ह्यातील ६८ महाविद्यालयात आयोजन आणि आठ हजार ९८ विद्यार्थ्यांना सामावून घेण्यात आले. या कार्यक्रमात नव मतदार नोंदणी करणे, मतदान ओळखपत्रांचे वितरण करण्यात आले तसेच यानिमित्ताने आयोजित केलेल्या आपत्ती व्यवस्थापन शिबिराच्या माध्यमातून आपत्तीच्या प्रसंगामध्ये घ्यायची काळजी, करायचे मदतकार्य यासाठी प्रशिक्षण व माहिती देण्यात आली. युवावर्गाला काही कार्यक्रमांमध्ये यासह स्पर्धा परीक्षांबद्दल माहिती दिली गेली. आपत्ती व्यवस्थापन शिबिर प्रशिक्षणादरम्यान आपदा मित्र ओळखपत्रेदेखील देण्यात आली.

समाजातील विविध घटकांपर्यंत पोहचण्यासाठी महसूल सप्ताहामध्ये रोज वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. युवावर्गापाठोपाठ आपत्तीमधील पीडित नागरिकांना दिलासा देणारे पाऊल टाकण्यात आले. एक हात मदतीचा हा तिसऱ्या दिवशी ३ जुलै रोजी होणाऱ्या कार्यक्रमांसाठी आपत्तीप्रवण क्षेत्रातील गावे निवडण्यात आली. यासाठी यंत्रणा थेट जिल्ह्यातील ३०० गावामध्ये पोहचली. तेथील आपत्ती व्यवस्थापन आराखडे बनविण्यात आले. यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी अभिनव संकल्पना अंमलात आणण्याची सूचना केली. इर्शाळगडच्या आपत्तीमध्ये बचावकार्य राबवताना महत्त्वाची अडचण झाल्याने राज्यात प्रथमत:च आपत्तीची संभावना असलेल्या गावातील नागरिकांचा डिझास्टर अप्रायझल डेटा कार्ड (डॅड कार्ड) तयार करण्यात आले. सप्ताहाच्या अनुषंगाने झालेल्या सर्व्हेमध्ये चार हजार १२६ नागरिकांचे डॅड कार्ड तयार झाले.

४ जुलै रोजी महत्त्वपूर्ण अशा जनसंवाद उपक्रमातून अन्नदात्या शेतकऱ्यापर्यंत पोहचून त्याचे फेरफार अदालतीचे आयोजन करण्यात आले. याच दिवशी स्वच्छता अभियान राबवत कार्यालयांच्या परिसरातील कचरा, दीर्घकाळ प्रलंबित निर्लेखन करावयाचे साहित्य, फर्निचर यांचे निर्गतीकरण करण्यात आले. सैनिक हो तुमच्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करताना महसूल सप्ताहाच्या चौथ्या दिवशी ५ ऑगस्ट रोजी देशाच्या संरक्षणासाठी प्राणांची बाजी लावणाऱ्या सैनिकांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करताना त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबीयांना सामावून घेण्यात आले. यामध्ये जिल्ह्यातील नऊ जणांना देण्यात येणाऱ्या शासकीय जमीनीबाबत प्रक्रिया पूर्ण करुन या कालावधीत सैनिक कुटुंबियांना सन्मानाने वितरण करण्यात आले. सहाव्या दिवशी ६ ऑगस्ट रोजी शासनाचा कणा असलेल्या महसूल विभागातील जिल्हा व तालुका कार्यालयांमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये जवळपास १२०० अधिकारी कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली होती.

महसूल सप्ताहाचा समारोप ७ जुलै झाला. यानिमित्ताने विभागाच्या विविध योजनांची माहिती देणारी घडीपुस्तिका आणि तसेच महसूल सप्ताहाबाबत भरत सावंत यांनी काढलेल्या आधारवड या तैलचित्राचे अनावरण कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे व विविध मान्यवरांच्या हस्ते झाले. इर्शाळवाडीच्या आपत्तीमध्ये तत्काळ धावून जात वेगात मदतकार्य केले गेले. या मदत व बचावकार्यातील तसेच यापूर्वी शिवराज्याभिषेक दिन सोहळाप्रसंगीचे कर्तव्य बजावणारे अधिकाऱ्यांसह यासह महसूल विभागातील उत्कृष्ट काम करणारे अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी महसूल सप्ताहानिमित्त गौरवण्यात आले.

महसूल विभागाचे प्रतिबिंब हे गावामध्ये आहे. महसूल सप्ताहामध्ये चावडी वाचनापासून काम करण्यात आले. सात दिवसांमध्ये सप्तरंगी कामाची आखणी करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयापासून तहसिल ते तलाठी स्तरापर्यंत नियोजन करून नोडल अधिकारीदेखील नेमण्यात आले. स्वच्छतेला, आरोग्याला महत्व देताना उपक्रमातून सैनिक, विद्यार्थी, आदिवासी यांच्यापर्यंतदेखील पोहचण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात स्वच्छता करून सुशोभीकरण करण्यात आले. महसूलमंत्र्यांच्या प्रेरणेतून ही महसूल सप्ताहाची संकल्पना राबविण्यात आली. यासाठी भूमीअभिलेख, दुय्यम निबंधक कार्यालय यांनासुद्धा सहभागी करून घेण्यात आले. जिल्ह्यात आलेल्या आपत्तीमध्ये अधिकारी, कर्मचाऱ्यांनी अतिशय चांगले काम केले.

महसूल सप्ताहादरम्यान जिल्ह्यात ४०६ चावडी वाचन व ६८ महाविद्यालयांमध्ये युवासंवाद कार्यकम, एक हजार ९८ नव मतदार ओळखपत्र देण्यात आली. ३०० आपत्तीप्रवण गावांचे नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन आराखडे एक हजार ८६ महसूल दाखले, एक हजार २०० महसूल कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी, दरडप्रवण गावातील चार हजार कुटूंबांचे डॅड कार्ड (डिझास्टर प्राइझल डेटा कार्ड) पूर्ण करण्यात आले. यासह १३३ महसूल अदालती, २० अनुकंपाधारकांना नियुक्त्या, देशाच्या संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावलेल्या नऊ वीर सैनिक कुटुंबीयांना जमीन वितरण, ५२ अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या चांगल्या कामाचा गौरव ;ही उपलब्धी ठरली आहे.

रायगड हा आपत्तीप्रवण जिल्हा असून येथे काम करणे हे आव्हानात्मक आहे. इर्शाळगडचे आपत्ती व्यवस्थापनाचे राज्यपातळीवर दखल घेतलेले कामे इथून झाले. माझी माती, माझा देश होत आहेत. महसूल यंत्रणेच्या कार्यप्रवणतेमुळे अधिक चांगले काम जिल्ह्यात होत आहे. या पार्श्वभूमीवर अधिकारी, कर्मचाऱ्यांनी काम करताना संवेदनशीलपणे कार्य करावे व लोकसेवक म्हणून आपली जबाबदारी पूर्ण करावी यासाठी त्यांना प्रेरित करणारा महसूल सप्ताहाचा हा कालावधी महत्वाच्या होता.

**–माहिती अधिकारी,**
जिमाका, रायगड–अलिबाग

# राज्यातील खेळाडूंना प्रशिक्षण देण्यासंदर्भात जपानी शिष्टमंडळाशी चर्चा

## क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी साधला संवाद; सकारात्मक प्रतिसाद



**मुंबई : प्रतिनिधी**

पुणे येथे आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. त्या विद्यापीठामध्ये जपानची मदत घेऊन राज्यातील खेळाडूंना क्रीडा वैद्यकशास्त्र आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रशिक्षण देण्यासंदर्भात क्रीडामंत्री संजय बनसोडे आणि जपानचे शिष्टमंडळ यांच्यात सविस्तर चर्चा झाली.

मंत्री बनसोडे यांची जपानच्या शिष्टमंडळाने अलीकडेच भेट घेतली. शिष्टमंडळात मुंबईचे कौन्सुल जनरल डॉ. फुकाहोरी यासुकाता, डेप्युटी चीफ ऑफ मिशन कनेक तोशिहिरो, पोलिटिकल सेक्शन रिसर्चर शिमादा मेगुमी तसेच आमदार बाबासाहेब मोहनराव पाटील उपस्थित होते.

महाराष्ट्राचे क्रीडा विद्यापीठ आणि जपानचे क्रीडा विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार करण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. जपानमध्ये झालेल्या २०२० टोकियो ऑलिम्पिक स्पर्धेनंतर तेथील ऑलिम्पिक वस्तू संग्रहालयाच्या धर्तीवर पुणे येथील होऊ घातलेल्या भव्य अशा ऑलिंपिक भवनात ऑलिम्पिक संग्रहालय तयार करता येऊ शकेल यावरही चर्चा करण्यात आली.

जपानने तंत्रज्ञान, पर्यावरण, क्रीडा क्षेत्रात भरीव काम केले. त्यामुळे जापान आज क्रीडाक्षेत्रात अग्रेसर देश आहे. तसेच जपान हा शिस्तप्रिय, पर्यावरणपूरक जीवनपद्धती, बुद्धीजम मानणारा देश आहे. त्यामुळे बुद्धीजम, क्रीडा, बंदरे, युवक कल्याण अशा विषयांवर जपानसोबत काम करता येईल, असे मत मंत्री बनसोडे यांनी व्यक्त केला.

जपानच्या शिष्टमंडळाने सकारात्मक प्रतिसाद देत भारत-जपान संबंध दृढ करण्याची ही योग्य वेळ असल्याचे मत जपानचे कॉन्सुल जनरल डॉ. फुकाहोरी यासुकाता यांनी व्यक्त केले. लवकरच या संदर्भात विस्तृत चर्चा करण्यासाठी जपान उत्सुक असल्याचे शिष्टमंडळ सदस्यांनी सांगितले.

मंत्री बनसोडे यांनी राष्ट्रकुल महाराष्ट्र विधिमंडळ सदस्यांसमवेत संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे आयोजित केलेल्या जपान येथे अभ्यास दौरा केला. त्यादरम्यान जपानसोबत त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध निर्माण झाले. बनसोडे हे मंत्री झाल्यामुळे त्यांचे अभिनंदन करण्यासाठी जपानचे शिष्टमंडळ मंत्रालयात त्यांना भेटण्यासाठी आले होते. मंत्री बनसोडे यांनी या वेळी शिष्टमंडळाच्या सदस्यांचा पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान केला.

## तिलक वर्माची फलंदाजी शानदार आणि आश्वासक -रोहित शर्मा

**मुंबई : प्रतिनिधी**

वेस्ट इंडिजविरुद्धच्या टी-२० मालिकेत भारतीय युवा खेळाडू तिलक वर्मा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करीत आपल्या फलंदाजाने सर्वांना प्रभावित केले आहे. त्यामुळे त्याला आशिया चषक आणि विश्वचषक संघात स्थान मिळावे, अशी मागणी आजी-माजी खेळाडूंकडून होत आहे. याबाबत कर्णधार रोहित शर्माने तिलकबद्दल मत व्यक्त केले आहे.





तिलक वर्माबद्दलच्या प्रश्नाचे उत्तर देताना रोहित शर्मा म्हणाला की, मला त्याच्या फलंदाजीमध्ये तो ज्या वयात आहे, त्यापेक्षा तो अधिक परिपक्व असल्याचे दिसते. त्याला त्याची फलंदाजी चांगल्या प्रकारे माहीत आहे. मी त्याच्याशी बोलतो तेव्हा मला कळते की, त्याला फलंदाजी चांगलीच समजते. कधी फटके मारायचे आणि कोणत्या वेळी फलंदाजी कशी करायची हे त्याला माहीत आहे. रोहितने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण सांगितले की, तो खूप शानदार आणि आश्वासक वाटला. शेवटी भारतीय कर्णधार म्हणाला की, मला एवढेच सांगायचे आहे विश्वचषक वगैरे माहिती नाही, पण तो खूप हुशार आहे आणि त्याने काही डावांतच हे दाखवून दिले आहे.

## बीओबी कप बुद्धिबळ स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे स्वातंत्र्य दिनानिमित्त १३ ऑगस्ट रोजी बीओबी कप ८, ९, १०, ११, १४, १५ वर्षाखालील मुला-मुलींची बुध्दिबळ स्पर्धा आरएमएमएस मुंबईतील परळ येथे आयोजित करण्यात आली आहे. बँक ऑफ बडोदा मुंबई विभाग, आयडियल ग्रुप, आरएमएमएस व मुंबई शहर जिल्हा बुध्दिबळ संघटना सहकार्याने ही स्पर्धा स्विस लीग पद्धतीने होणार आहे.

प्रत्येक वयोगटात किमान चार साखळी फेऱ्यांमधील प्रत्येक फेरी १५-१५ मिनिटे अधिक ३ सेकंद इन्क्रिमेंटची राहील. प्रत्येक वयोगटातील पहिली १० मुले व पहिल्या पाच मुलींना बीओबी कप देऊन गौरविण्यात येईल. बुध्दिबळपट, घड्याळ आदी साहित्य पुरविण्यात येणार आहेत.

## रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांचे फुटबॉल स्पर्धेत यश





**खारघर : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका जिल्हास्तरीय सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धा नुकतीच खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयाच्या मैदानावर झाली. या स्पर्धेत खारघरच्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलने तृतीय क्रमांक पटकाविला.

स्पर्धेच्या १७ वर्षाखालील वयोगटात रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमधील मुलांच्या संघाने सहभाग घेतला व हे यश मिळविले.

याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेत रामशेठ ठाकूर व शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले.

## शाकिब अल हसन बांगलादेशच्या कर्णधारपदी

**ढाका : वृत्तसंस्था**



तमिम इक्बालने आधी कर्णधार पद सोडले. पंतप्रधानांनी समजावल्यानंतर त्याने निर्णय बदलला, परंतु काही दिवसांनी पाठीच्या दुखापतीचे निमित्त सांगून आशिया चषक स्पर्धेतून माघार घेतली. बांगलादेश क्रिकेट संघात हा गोंधळ सुरू असताना एक चांगली बातमी समोर आली आहे. अष्टपैलू खेळाडू शाकिब अल हसन याची बांगलादेशच्या कर्णधारपदी निवड केली गेली आहे. आगामी आशिया चषक आणि वन डे वर्ल्डकप स्पर्धेत शाकिबच्या नेतृत्वाखाली बांगलादेश संघ खेळणार आहे.

बांगलादेशचा संघ सध्या अडचणीत आहे आणि अशा परिस्थिती शाकिबने ही जबाबदारी स्वीकारली आहे. ५ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या वन डे वर्ल्डकपपूर्वी आशिया चषक आणि त्यानंतर सप्टेंबरमध्ये न्यूझीलंडविरुद्ध घरच्या वनडे मालिकेत शाकिब संघाचे नेतृत्व करेल. शाकीब आता तिन्ही संघात बांगलादेशचा कर्णधार आहे. गेल्या वर्षी कसोटी कर्णधार आणि ट्वेन्टी-२० कर्णधार म्हणून तिसऱ्यांदा सुरुवात केली. शाकिबकडे नेतृत्व गेल्याने पाकिस्तानची डोकेदुखी नक्की वाढणार आहे, कारण त्यांच्याविरुद्ध शाकिबची कामगिरी चांगली झालेली आहे.


## आशियाई क्रीडा स्पर्धेत निवड न झालेल्या शिखर धवनने सोडले मौन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघ आगामी आशियाई क्रीडा स्पर्धेत भाग घेणार आहे. युवा फलंदाज ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखाली संघाची निवड करण्यात आली आहे. यापूर्वी अनुभवी खेळाडू शिखर धवनकडे कर्णधारपद सोपवण्यात येणार असल्याचे बोलले जात होते, मात्र तसे झाले नाही. त्याला संघातही स्थान मिळाले नाही. धवनला संधी न मिळाल्याचे दु:ख त्याने व्यक्त केले आहे.

३७ वर्षीय धवनने १० महिन्यांपूर्वी कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारली होती, मात्र निवडकर्त्यांनी या वेळी त्याला वगळले आणि ऋतुराज गायकवाडची कर्णधार म्हणून नियुक्ती केली. याबाबत पीटीआय या वृत्तसंस्थेशी बोलताना धवन म्हणाला, जेव्हा माझे नाव आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी संघात नव्हते, तेव्हा मला थोडा धक्का बसला होता. मग मला वाटले की, ते काहीतरी वेगळा विचार करीत आहेत. तुम्हाला आता फक्त ते सत्य स्वीकारावे लागेल. ऋतुराज संघाचे नेतृत्व करेल याचा मला आनंद आहे. सर्व तरुण मुले आहेत आणि मला खात्री आहे की, ते चांगले काम करतील. भारताला सुवर्णपदक जिंकून देण्यात यशस्वी होतील.

शुबमन गिलने रोहित शर्मासोबत सलामीला खेळायला सुरुवात केल्यापासून धवनचा पत्ता कट झाला आहे. भारतीय संघाने आता धवनला मागे टाकल्याचे दिसते. डिसेंबर २०२२मध्ये बांगलादेश



दौऱ्यानंतर त्याला एकदिवसीय संघातून वगळले जाईपर्यंत धवन वन डे फॉरमॅटचा मुख्य खेळाडू होता. गेल्या दशकात भारताच्या एकदिवसीय क्रिकेटमधील अव्वल फलंदाजांपैकी एक असलेल्या धवनने सांगितले की, भविष्यात काय घडेल हे मला माहीत नाही, पण संधी मिळाल्यास तो त्यासाठी तयार असेल.

### पुनरागमनासाठी फिट

भविष्यातील कारकिर्दीविषयी भारताचा डावखुरा फलंदाज धवन म्हणाला, मी निश्चितपणे पुनरागमन करण्यास उत्सुक आहे. त्यासाठी मी स्वत:ला फिट ठेवले आहे. नेहमीच संधी असते, मग ती एक टक्के असो किंवा २० टक्के. मला अजूनही प्रशिक्षण घ्यायला आवडते त्यातून मला खेळण्याचा आनंद मिळतो. सराव करत राहणे या सर्व गोष्टी माझ्या नियंत्रणात आहेत. जो काही निर्णय घेतला जातो त्याचा मी आदर करतो. धवन अजूनही केंद्रीय करार असलेला क्रिकेटपटू आहे आणि तो राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये बराच वेळ घालवतो.

## ख्रिस्तियानो रोनाल्डो सलग तिसऱ्या वर्षी इन्स्टा स्टार

**लिस्बन : वृत्तसंस्था**

ख्रिस्तियानो रोनाल्डो पुन्हा एकदा आपल्या प्रतिस्पर्धकांना मागे टाकून सलग तिसऱ्या वर्षी इन्स्टाग्रामवर सर्वाधिक कमाई करणारा बनला. जुलैमध्ये सौदी अरेबियाला गेल्यानंतर २०१७नंतर प्रथमच फोर्ब्सने जगातील सर्वाधिक कमाई करणारा अॅथलिट म्हणून स्थान मिळवलेला रोनाल्डो आता २०२३ इन्स्टाग्राम रिच लिस्टमध्ये अव्वल आहे.



इन्स्टाग्राम शेड्युलिंग टूल, हॉपर एचक्यूद्वारे संकलित केलेल्या २०२३ इन्स्टाग्राम रिच लिस्टनुसार रोनाल्डो प्रति इन्स्टाग्राम पोस्टमधून ३.२३ अमेरिकन डॉलर कमावतो. ही मोठी रक्कम मिळण्याचे कारण म्हणजे सोशल मीडियावर या दिग्गजाचे जवळपास ६०० दशलक्ष फॉलोअर्स झाले आहेत. यादीतील त्याचा मुख्य प्रतिस्पर्धी अर्जेंटिनाचा लिओनेल मेस्सी, प्रत्येक इन्स्टाग्राम पोस्टसाठी सुमारे २.६ दशलक्ष कमावतो. यामुळे फुटबॉल दिग्गज रोनाल्डो आणि मेस्सी केवळ इतर सर्व क्रीडा व्यक्तिमत्त्वांपेक्षा पुढे आहेत. गायिका सेलेना गोमेझ, रिॲलिटी टीव्ही स्टार आणि उद्योजक काइली जेनर आणि अभिनेता ड्वेन 'द रॉक' जॉन्सन यांसारख्या ख्यातनाम सेलिब्रेटींच्यादेखील पुढे आहेत.

भारतीय क्रिकेटपटू विराट कोहली आणि ब्राझीलचा फुटबॉलपटू नेमार हे फक्त दोनच खेळाडू टॉप-२०मध्ये स्थान मिळवू शकले आहेत. नेमार त्याच्या पॅरिस सेंट-जर्मेन संघातील सहकारी किलियन एमबाप्पेच्या प्रत्येक पोस्टपेक्षा जवळजवळ दुप्पट रक्कम कमावतो.

## महिलांच्या द हंड्रेड स्पर्धेत वेल्श फायरचा थरारक विजय

### शबनिम इस्माईलने हॅट्ट्रिक घेत फिरवला सामना



**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या द हंड्रेड महिलांच्या स्पर्धेत बर्मिंगहॅम फिनिक्स आणि वेल्श फायर यांच्यात सामना खेळला गेला. यामध्ये वेल्श संघाने प्रथम फलंदाजी करताना १३७ धावा केल्या. प्रत्युत्तरात बर्मिंगहॅम संघाला शेवटच्या तीन चेंडूंवर विजयासाठी चार धावांची गरज होती, पण दक्षिण आफ्रिकेची वेगवान गोलंदाज शबनिम इस्माईल हिने सलग तीन विकेट घेत धुमाकूळ घातला आणि वेल्श संघाने सामना तीन धावांनी जिंकला.

एजबॅस्टन मैदानावर बर्मिंगहॅम संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रत्युत्तरात वेल्श संघाकडून कर्णधार टॅमी ब्युमॉन्टने ४० चेंडूंत नऊ चौकार आणि एक षटकारासह ५९ धावांची धडाकेबाज खेळी केली. त्यामुळे बर्मिंगहॅम संघाने १०० चेंडूंत सात विकेट गमावत १३७ धावा केल्या. १३८धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना बर्मिंगहॅमचे सलामीवीर टेस फ्लिंटॉफ आणि सोफी डिव्हाईन यांनी ४१ धावांची भागीदारी केली. सोफी १९ चेंडूंत चार चौकार आणि एका षटकारासह २९ धावा करून बाद झाली. यानंतर एमी जोन्स आणि फ्लिंटॉफने संघाला सहज विजयाच्या उंबरठ्यावर आणले.

१०० चेंडूंच्या सामन्यात पाच चेंडूंचे एक ओव्हर असते. ज्यात शबनिम शेवटचे षटक टाकायला आली होती. शबनिमच्या पहिल्याच चेंडूवर एमी जोन्सने एकेरी धाव घेतली. यानंतर फ्लिंटॉफने दुसऱ्या चेंडूवर चौकार ठोकला. आता बर्मिंगहॅमला विजयासाठी तीन चेंडूंत ४ धावांची गरज होती. तिसऱ्या चेंडूवर शबनिमने फ्लिंटॉफला पायचीत केले. त्यामुळे फ्लिंटॉफ ४५ चेंडूंत सहा चौकारांसह ५५ धावांवर बाद झाली. चौथ्या चेंडूवर एरिस बर्न्स आणि पाचव्या चेंडूवर इस्सी वँगला बाद करून हॅट्ट्रिक पूर्ण केली. अशा प्रकारे बर्मिंगहॅमचा संघ चार बाद १३४ धावाच करू शकला. एमी जोन्सने ३४ चेंडूंत सहा चौकारांसह नाबाद ४८ धावा केल्या.

## धोनीने चाहत्यांसोबत घेतला सेल्फी, व्हिडीओ व्हायरल

**रांची : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीगच्या १६व्या मोसमात चेन्नई सुपर किंग्जला (सीएसके) विजेतेपद मिळवून दिल्यानंतर कर्णधार महेंद्रसिंह धोनी रांची येथील त्याच्या घरी कुटुंबासोबत वेळ घालवत आहे. दरम्यान, धोनीचे अनेक व्हिडिओ समोर आले आहेत, ज्यात तो चाहत्यांसोबत किंवा विंटेज कार चालवताना दिसत आहे. आता धोनीचा एका चाहत्यासोबतचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.



आयपीएल हंगाम संपल्यानंतर लगेचच धोनीच्या गुडघ्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली आणि सध्या तो रिहॅब प्रक्रियेतून जात आहे. धोनी रांचीमध्ये अनेक वेळा फिरताना दिसला. गेल्या आठवड्यात जेव्हा तो विंटेज कार पॉन्टियाक फायरबर्ड (१९७३) चालवताना दिसला. आता धोनीचा एका चाहत्यासोबतचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, ज्यामध्ये तो त्याच्याशी बोलताना दिसत आहे.

या व्हिडीओमध्ये धोनी त्याच्या कारमध्ये बसला आहे. दुसरीकडे बाईकवरील दोन चाहत्यांनी त्याच्या विजयाच्या चिन्हासह फोटो काढण्याची विनंती केली, तेव्हा धोनीने लगेचच त्यांना होकार दिला. या वेळी धोनी कारच्या पॅसेंजर सीटवर बसला होता. हा व्हिडीओ व्हायरल झाला आहे.

जीवेत् शरद: शतम्!
प्रकाश मोकल
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
गणेश कोळी

जीवेत् शरद: शतम्!
पी. लक्ष्मीनारायण रेड्डी
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
शिवाजी अहिरकर

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com